# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड बुधवार । दि. २३ सप्टेंबर २०२६ । अंक १०८ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## रायगड रोपवे दोन महिने बंद

**रायगड :** रायगड किल्ल्यावर जाण्यासाठीची रोपवे सेवा देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षा तपासणीसाठी जवळपास दोन महिने बंद राहणार आहे. १६ नोव्हेंबरपासून सेवा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले आहे. या कालावधीत रोपवे मार्ग, उपकरणे आणि सुरक्षा यंत्रणेची तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे पर्यटकांना गडावर जाण्यासाठी पायरी मार्गाचा वापर करावा लागणार आहे. पायरी मार्गाने गडावर पोहोचण्यासाठी साधारण एक ते दीड तास, तर रोपवेने अवघ्या पाच ते सात मिनिटांत गडावर पोहोचता येते.

पान ५ वर

## कोयना धरण परिसरात भूकंपाचे धक्के

**सातारा :** महाराष्ट्राची वरदायिनी असलेल्या कोयना धरण परिसराला मध्यरात्री साडेबारा ते पहाटे चार या वेळेत भूकंपाचे पाच सौम्य धक्के बसले. या भूकंपांची तीव्रता २ ते २.५ रिश्टर स्केलदरम्यान असल्याने धक्के नागरिकांना जाणवले नाहीत. भूकंपामुळे कोयना धरणाला कोणताही धोका निर्माण झालेला नसून, परिसरात कुठेही पडझड झाल्याचे वृत्त नाही. मध्यरात्री साडेबारा वाजता २.१ रिश्टर स्केलचा पहिला धक्का बसला. त्यानंतर दीड वाजता २.३, सव्वा तीनला २.२, पंधरा मिनिटांनी २.५ आणि पहाटे चार वाजता २.१ रिश्टर स्केलचा धक्का बसला.

पान ५ वर

# हुतात्म्यांची अवहेलना!

- **चिरनेर जंगल सत्याग्रहातील सातही स्मारकांची दुरवस्था**
- **कुठे कपडे-मासळी वाळवली जातेय, तर कुठे वाहनांची होतेय पार्किंग**

**दत्तात्रेय म्हात्रे**
**। चिरनेर ।**

ज्या हुतात्म्यांनी देशासाठी छातीवर ब्रिटिशांच्या गोळ्या झेलल्या, त्यांच्याच स्मारकांना आज शासनाच्या अनास्थेने उकिरड्याचे स्वरूप आले आहे. चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांचे स्मरण जपण्यासाठी उभारण्यात आलेली चिरनेर, खोपटा, कोप्रोली, पाणदिवे, धाकटी जुई, मोठी जुई आणि दिघोडे येथील स्मारके आज अक्षरशः अडगळीत पडली आहेत. काही ठिकाणी कपडे, मासळी व धान्य वाळवण्यासाठी, तर काही ठिकाणी वाहने पार्क करण्यासाठी या स्मारकांचा वापर होत असल्याने स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या

पान ५ वर

> स्मारकाच्या दुरुस्ती व देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत आहे.
>
> – भास्कर मोकल, सरपंच, चिरनेर

> मागील अनेक वर्षांपासून या स्मारकांचा ताबा अद्यापही राजिपकडेच आहे. निधी उपलब्ध करून देण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. निधी उपलब्ध झाल्यास स्मारकांची दुरुस्ती करणे शक्य होईल.
>
> – डी.एम. पाटील, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण





### हुतात्म्यांच्या स्मारकांसाठीही निधीची प्रतीक्षा?

एकीकडे स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास जपण्याच्या घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात हुतात्म्यांच्या स्मारकांची अशी दुरवस्था होत असेल, तर या घोषणांचा उपयोग काय, असा सवाल उपस्थित होत आहे. स्मारक कोणाच्या ताब्यात यापेक्षा त्याची अवस्था सुधारण्याची जबाबदारी कोण घेणार, हा खरा प्रश्न आहे. हुतात्म्यांच्या स्मृतींचा हा अपमान थांबवून सातही स्मारकांची तातडीने पाहणी, दुरुस्ती आणि नियमित देखभालीची व्यवस्था करावी, अशी मागणी स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांकडून होत आहे.

## राज्यकर्ते कायद्यापेक्षा स्वत:ला मोठे मानतात




- **उल्का महाजन यांचा घणाघाती आरोप**
- **सेझबाधित शेतकऱ्यांनी काढला धडक मोर्चा**

**। पेण । प्रतिनिधी ।**

आजही अनेक जमिनींचा प्रत्यक्ष ताबा शेतकऱ्यांकडेच आहे. त्यामुळे ज्या उद्देशासाठी जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या, तो उद्देश साध्य झाला नसेल तर कायद्यानुसार त्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळायला हव्यात. मात्र, राज्यकर्ते स्वत:ला कायद्यापेक्षा मोठे समजत असल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जात आहे, असा घणाघाती आरोप उल्का महाजन यांनी केला.

पेण, पनवेल आणि उरण तालुक्यातील सेझबाधित शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळाव्यात, या प्रमुख मागणीसाठी शेतकऱ्यांनी मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी पेण शहरात धडक मोर्चा काढला. पेण येथील गांधी मंदिरापासून सुरू झालेला हा मोर्चा धरमतर रोडमार्गे थेट प्रांत कार्यालयावर नेण्यात आला. या मोर्चामध्ये शेकडो

पान ५ वर

### आमच्या जमिनी आम्हाला परत करा

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी जमिनी आमच्या हक्काच्या, नाही कुणाच्या बापाच्या; आमच्या जमिनी आम्हाला परत करा, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी प्रांत कार्यालयात वैयक्तिक स्वरूपात हरकती दाखल केल्या. हरकती दाखल करण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी रांग लागली होती. दूरवरून आलेल्या शेतकऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली भूमिका प्रशासनासमोर मांडली.

## वेधक

### राज्यसभेच्या १२ जागांसाठी निवडणूक

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या १२ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. १६ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार असून, त्याच दिवशी मतमोजणी केली जाणार आहे. निवडणुकीची अधिसूचना २९ सप्टेंबरला जारी होईल. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर असून, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबरला होणार आहे. ९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. ११ विद्यमान खासदारांचा कार्यकाळ २५ नोव्हेंबरला संपत आहे. यात भाजपचे ९, समाजवादी पक्षाचा एक आणि बहुजन समाज पक्षाचा एक खासदार आहे.

### विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक

**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून, २७ ऑक्टोबरला मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ६ ऑक्टोबर असून, ७ ऑक्टोबरला अर्जांची छाननी होईल. ९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. औरंगाबाद विभाग पदवीधर, पुणे विभाग पदवीधर, नागपूर विभाग पदवीधर, अमरावती विभाग शिक्षक, पुणे विभाग शिक्षक या मतदारसंघांचा यामध्ये समावेश आहे.

# रोजगार महाकुंभाला कंपन्यांची पाठ!

**दोनशे कंपन्यांची अपेक्षा; आतापर्यंत अवघ्या ७४ कंपन्यांची नोंदणी**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांना रोजगाराची संधी देण्यासाठी रोजगार महाकुंभाचे आयोजन केले असताना कंपन्यांकडून मात्र अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. मंगळवारी (दि. २९) जिल्ह्यात १२ ठिकाणी होणाऱ्या या मेळाव्यासाठी सुमारे २०० कंपन्यांची नोंदणी अपेक्षित असताना आतापर्यंत केवळ ७४ कंपन्यांनीच नोंदणी केली आहे. त्यामुळे कंपन्यांचा सहभाग वाढणार का, याकडे लक्ष लागले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत हे मेळावे आयोजित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील २ हजार ९१४ बेरोजगारांनी नोंदणी केली असून, १ हजार ६८१ रिक्त पदे भरली जाणार आहेत.

पनवेलमध्ये चार, माणगाव, सुधागड, कर्जत, पेण, खालापूर व अलिबाग येथे प्रत्येकी एक आणि रोहा येथे दोन अशा एकूण १२ ठिकाणी मेळावे होणार आहेत.

मेळाव्यात मुलाखतीला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात आले आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमार्फत पहिल्या टप्प्यात १ हजार ८१४ जणांना प्रशिक्षण देण्यात आले. व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत, प्रभावी स्व-परिचय, निवड प्रक्रियेची तयारी आणि संवाद कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाची तयारीही सुरू आहे. कौशल्य रोजगार उद्योजकता विभागाने अनेक कंपन्यांशी थेट संपर्क साधून सहभागाचे आवाहन केले आहे.

### अल्प प्रतिसाद

मेळावा तोंडावर आला असतानाही २०० कंपन्यांच्या अपेक्षेच्या तुलनेत केवळ ७४ कंपन्यांची नोंदणी झाली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जास्तीत जास्त कंपन्यांनी मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. आता या आवाहनाला कंपन्या किती प्रतिसाद देतात, याकडे लक्ष लागले आहे.

# वायशेतमध्ये लाखोंचा अवैध दारुसाठा जप्त

- **रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाची मोठी कारवाई**
- **देशी, विदेशी दारुसह लाखोंचा ऐवज हस्तगत**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमधील वायशेतमध्ये लाखोंचा अवैध दारुसाठा आढळून आला. विक्रीसाठी ठेवण्यापासून वाहतूक करणाऱ्या दोघांना रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने ताब्यात घेऊन त्यांच्याकडून दहा लाख २९ हजार १७३ रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. त्यात सव्वा पाच लाख रुपयांच्या दारुच्या साठ्याचा समावेश आहे. रायगड पोलिसांनी ही सर्वात मोठी कारवाई केली असून, या कारवाईने अवैध दारु विक्री, वाहतुकीवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

अलिबाग तालुक्यातील वायशेत येथे बेकायदेशीररित्या देशी, विदेशी दारु विक्री व वाहतूक होत असल्याची माहिती रायगडच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाला मिळाली. पोलीस निरीक्षक मिलींद चापडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. या पथकाने शुक्रवारी (दि.१८) दुपारी छापा टाकला. या छाप्यात वायशेतमधील एका घराच्या मागील बाजूस ११ हजार ४५५ रुपयांचा

पान ५ वर

### पतीनेच रचला घरफोडीचा बनाव!

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

आर्थिक अडचणीमुळे पत्नीचे सोन्याचे दागिने स्वत:च लपवून ठेवायचे आणि नंतर घरफोडी झाल्याचा बनाव करून पोलिसांत तक्रार द्यायची; मात्र पतीचाच हा डाव नागोठणे पोलिसांनी उधळून लावला. आंबेराई-बेनसे येथील दिपक रामचंद्र भुरे याने स्वत:च्या घरात चोरी झाल्याची तक्रार दिली होती. तपासात त्यानेच दागिने लपवून घरफोडीचा बनाव केल्याचे निष्पन्न झाले असून, त्याच्याकडून ६ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

५ सप्टेंबर रोजी दिपक भुरे याने नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. ४ सप्टेंबरच्या रात्री तो आणि त्याची

पान ५ वर

# शिक्षक पतपेढी वादाच्या भोवऱ्यात

- **ताळेबंदातील फरकासह पाच कोटींच्या थकबाकीचा आरोप**
- **सभासदांचे ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शिक्षकांच्या पतपेढीच्या कारभारातच ताळेबंदाचा फरक आणि तब्बल पाच कोटींची थकबाकी असल्याच्या आरोपांनी अलिबागमधील प्राथमिक शिक्षक पतपेढी वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यातच लेखापरीक्षणासाठी आकारली जाणारी फी अवास्तव असल्याचा आरोप सभासदांनी केल्याने पतपेढीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या मुद्द्यावरून सभासद मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाच्या तयारीत होते. मात्र, संचालक मंडळाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

सभासद दीपक पाटील, निलेश तुरे आणि प्रसाद म्हात्रे यांनी पतपेढीच्या कारभाराबाबत गंभीर आक्षेप घेतले आहेत. त्यांच्या निवेदनानुसार, २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधीतील वैधानिक लेखापरीक्षण अहवालात ताळेबंदात फरक आढळून आला आहे. तसेच पतपेढीत

पान ५ वर






**वढावमध्ये सहा दिवसांपासून पाणीबाणी** | **प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन**

# पाण्यासाठी चिमुकलेच बनले रिपोर्टर!

**। पेण । मुस्कान खान ।**

पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी ग्रामस्थांना सहा-सहा दिवस वाट पाहावी लागत असेल, तर प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे साहजिकच आहे. पेण तालुक्यातील वाशी खारेपटा-वढाव गावात गेल्या सहा दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा ठप्प आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने अखेर गावातील शाळकरी मुलांनीच हातात फलक घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पाण्याचा प्रश्न मांडण्यासाठी चिमुकल्यांवर 'रिपोर्टर' बनून आपली व्यथा मांडण्याची वेळ आली, हेच




या समस्येचे गांभीर्य दाखवणारे चित्र आहे.

गावातील रुद्र म्हात्रे आणि त्याच्या मित्रांनी हातात 'पेण खारेपाट २०२६ पाणीप्रश्न' असा फलक घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. रुद्रने व्हिडिओच्या माध्यमातून गावातील पाणीप्रश्न मांडत नवीन जलवाहिनी टाकून शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. 'पाणी नाही, त्यामुळे कधी कधी शाळेत आंघोळ न करताच जावे लागते,' ही त्याची व्यथा ऐकूनही प्रशासनाची संवेदना जागी होणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. सहा दिवसांपासून नळ कोरडे आहेत.

पान ५ वर



# सणाचा आनंद गरजूंसोबत वाटला

■ 'एक मूठ धान्याची' उपक्रम ठरला कौतुकास्पद
■ कोकणवासीय समाज संस्थेचा पुढाकार

। माथेरान । प्रतिनिधी ।

माथेरानमध्ये सद्यस्थितीत कोकण वासीय समाज सेवाभावी संस्था उपक्रम राबविण्यात अग्रेसर दिसत आहे. संस्थेतर्फे समाजाच्या माध्यमातून नेहमीच सामाजिक उपक्रम राबविले जात असतात. यावर्षी सुध्दा त्यांनी गणेशोत्सवाचा आनंद साजरा करताना गरजू कुटुंबांचाही सण आनंदात जावा, या सामाजिक भावनेतून कोकणवासीय समाज संस्थेने 'एक मूठ धान्याची' हा स्तुत्य उपक्रम राबविला होता. गणपती बाप्पाच्या चरणी धान्य अर्पण करून गरजूंपर्यंत ते पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला माथेरानमधील गणपती धारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पाच दिवसांच्या गणेशोत्सवानंतर तांदूळ, डाळ, कडधान्य, साखर आदी धान्य मोठ्या प्रमाणात संकलित झाले. हे धान्य माथेरानमधील गरजू कुटुंबांना व वर्षातून एकदा सणासाठी येणाऱ्या गरजू डोंबारी-जरीमरी कुटुंबांना तसेच नेरळ येथील आसरा सुरक्षा सेल्टर येथील मुलींच्या अनाथाश्रमाला देण्यात आले. सणाचा आनंद स्वतःपुरता मर्यादित न ठेवता गरजूंच्या चेहऱ्यावरही आनंद फुलविण्याची ही संकल्पना सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरली.

या उपक्रमासाठी कोकण वासीय समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत सुतार, महिला अध्यक्ष सारिका पाटील, रवींद्र परब, परेंदु मोरे, ललित पांगसे, शैलेंद्र दळवी, कांचन केतकर, मंदिरा दळवी, गीता खाडे, दत्ता सणगरे, राजेंद्र सावंत, विजय सावंत तसेच समाजबांधव आणि माथेरानमधील नागरिकांचे विशेष सहकार्य लाभले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कोलमांडले ब, ता. श्रीवर्धन, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक प्रणिलसोहम प्रशांतकुमार सिन्हा यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोलमांडले ब, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २९१ | ०-६०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकुण ०-६१-०० | ०.४० |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क - हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

श्रीवर्धन,
तारीखः २२/०९/२०२६

सही/-
**ॲड. कोंडे देशमुख**
**पनवेल**

## पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

**लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय, आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल - ४१०२०६.**

Email - msbpanvel1993@gmail.com    Email : panvelcorporation@gmail.com

**जाहीर सूचना**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णयातील विषयानुसार ''हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'' अंतर्गत नागरी क्षेत्रातील शाळा विशेषतः मराठी शाळा, आरोग्य विषयक सुविधा विशेषतः महिला आरोग्यासाठीच्या उपाययोजना, पर्यावरण, पर्यटन विषयक सुविधा व नागरी स्थानिक संस्थांना आत्मनिर्भर करणाऱ्या उपाययोजना विकसित करणे या उद्देशाने राज्यातील महानगरपालिकामध्ये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील महानगरपालिका शाळांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, वाचन संस्कृती, खेळ व व्यायाम, स्वच्छ व आकर्षक शैक्षणिक वातावरण तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौशल्यविकास यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने अ.क्र. १ ते ७ मधील एकूण ७ कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

याबाबतची सविस्तर जाहीर सूचना व दरपत्रक नमूना पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
**उपायुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व तसे करार उभयतांमध्ये स्वाक्षरीत करण्यात आले आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| अनु. | मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | चिंचोटी | ८३/१ | १-०५-००<br>पो. ख. ०-०६-००<br>१-११-०० | २.२५ |
| २ | चिंचोटी | ८४/१ | ०-४१-००<br>पो. ख. ०-०२-२०<br>०-४३-२० | ६.२५ |
| ३ | चिंचोटी | ८४/२ | ०-५५-००<br>पो. ख. ०-०४-००<br>०-५९-०० | ८.४४ |
| ४ | चिंचोटी | ८५/१/ब | ०-१७-५०<br>पो. ख. ०-०२-००<br>०-१९-५० | २.३७ |
| ५ | चिंचोटी | ८५/२ | ०-६१-८०<br>पो. ख. ०-०३-५०<br>०-६५-३० | १४.१२ |

तसेच वर नमुद मिळकतीमध्ये येण्या-जाण्याकरीता खाली नमुद मौजे चिंचोटी येथील खाली नमुद मिळकतीमधून कायम स्वरुपी वहीवाटीचा रस्ता कराराद्वारे घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स. नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| चिंचोटी | ८२/२/ब | ०-४८-८०<br>पो.ख. ०-०४-८०<br>०-५३-६० | ७.६९ | पैकी श्री. वसंत गौरु ठाकूर यांच्या हिश्याच्या मिळकतीमधून ९ मीटर कायमस्वरुपी वहीवाटीचा रस्ता |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्यांना आपआपल्या मिळतीतून वर नमुद केल्याप्रमाणे व्यवहार करण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल मौजे चिंचोटी स.नं. ८३/१, ८४/१, ८४/२, ८५/२/ब व ८५/२ या मिळकती खरेदी करतील व मौजे चिंचोटी स. नं. ८२/२/ब या मिळकतीमधून वहीवाटीच्या रस्त्याबाबत करार करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २३/०९/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मुगपे, ता.कर्जत, जि.रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतींचे मालक/भोगवटादार-मेलडी मेकर रिसॉटस् प्रायव्हेट लिमिटेड यांचेंकडुन खरेदी घेण्याबाबत आमच्या अशिलांच्या व्यवहाराच्या वाटाघाटी सुरु आहेत.

**जमिन मिळकतींचे वर्णन**

**मौजे मुगपे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल**

| भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-४३.०० | ५.०७ |
| १ | २ | १-६०.६० | १७.८२ |
| २ | १ | ०-८६.९० | ३.०० |
| २ | ३ | ०-२२.०० | १.५६ |
| २ | ४ | ०-४०.०० | ०.३४ |
| ४ | १/ब | ०-१६.७० | ०.४८ |
| ९ | १ | ०-१८.५० | ०.९७ |
| ९ | २ | ०-०३.०० | ०.११ |
| ४७ | ८ | ०-२७.९०<br>पैकी ०-०३.०० क्षेत्राच्या रस्त्याच्या वहीवाटीचे हक्क | ०.३१ |
| ४७ | १० | ०-३२.५०<br>पैकी ०-१६.५० | ०.८३<br>०.४२ |

त्याअर्थी सदर संबंधित व्यक्तीं व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्झिशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१(एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील मेलडी मेकर रिसॉटस् प्रायव्हेट लिमिटेड यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.: २३/०९/२०२६.

**श्री. तुषार द.देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा.लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि.रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, पी.एन.पी. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रायव्हेट लिमिटेड, नोंदणीकृत पत्ता : ए५, आर्थर बंदर रोड, १८ आयोनिक, कुलाबा, मुंबई ४००००५, हे **"ML PRIVADA DOS"** (एम. एल. प्रविदा डॉस) या नौकेचे पुर्ण आणि कायदेशीर विद्यमान मालक असून सदर नौकेवर त्यांचा पुर्ण मालकी हक्क व अधिकार आहे. सदर नौकेचा नोंदणी क्रमांक **BDR - IV 01197** असून लांबी ३६ फुट रूंदी १२ फुट व उंची ३ फुट, जी. आर. टी. - ९ टी, मेक लार्सन कॅबरिओ ३५० आहे.

सदर **"ML PRIVADA DOS"** ही नौका पी.एन.पी. इन्फ्राप्रोजेक्टस् प्रायव्हेट लिमीटेड यांनी ओशन गोल्ड बोट क्लब प्रायव्हेट लिमिटेड यांचेड्रून दिनांक १७/१२/२०१२ रोजी खरेदी केलेली आहे. परंतु सदर नौकेसंदर्भातील पुढे नमुद केलेली मुळ कागदपत्रे/दस्त गहाळ झालेली असून शोध घेतला असता सापडून येत नाहीत.

(१) पी.एन.पी.इन्फ्राप्रोजेक्टस् व ओशन गोल्ड बोट क्लब प्रायव्हेट लिमीटेड यांचे दरम्यान स्वाक्षरीत झालेला नौका खरेदी करारनामा,

(२) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जारी केलेले नौका नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक **BDR - IV 01197**

सर्व संबंधीत व्यक्तींना या नोटीसीने कळविण्यात येते की, कोणत्याही व्यक्तीस वरील नमुद कागदपत्रे सापडल्यास अगर/ किंवा सदर नौकेवर गहाण, कर्जबोजा, विक्री यांसारखा कोणताही हक्क असल्यास त्यांनी त्याबाबत माहीती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यांसह ०७ दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांचे कार्यालयात कळवावी.

दिनांक : २२/०९/२०२६

सही /-
**पी.एन.पी.इन्फ्राप्रोजेक्टस् प्रायव्हेट लिमीटेड,**
नोंदणीकृत पत्ता : ए-५, आर्थर बंदर रोड,
१८, आयोनिक, कुलाबा, मुंबई ४००००५
संपर्क क्रमांक :

## -: जाहिर नोटीस :-

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे आशिल यांनी खालील वर्णनीत मिळकत कायम खुश खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत या निर्वेध व बोजारहित, बिनजोखमी असल्याचा भरवसा आमचे आशिलास जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भगवान तुकाराम पाभेकर व इतर ४ यांनी दिला आहे. याकरीता सदर मिळकतीबाबत हरकतीची खातर जमा करण्याकामी सदरची जाहिर नोटीस आमचे आशिलाचे वतीने देत आहे.

**मौजे टिटवे, ता.माणगांव, जि.रायगड येथील**
**जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.**

| स नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ५६/१/फ | १.२१.०० | ०.३७ |

येणेप्रमाणे उल्लेखित मिळकतीचे व्यवहाराबाबत कोणाचीही कसलीही हरकत, जाण्या-येण्याचा मार्ग अथवा गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, साठेकरार, कुळअखत्यारपत्र, भाडेपट्टा, जप्ती, मृत्युपत्र, अदलाबदल, हुकूम नामा, वाद-विवाद, वचनपावती इत्यादी प्रकारचे दस्त नोंदणीकृत अथवा बिगर नोंदणीकृत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे आत आपली लेखी हरकत प्रथम दर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे नोटीसमधील पत्त्यावर कळवावी, विहीत मुदतीत हरकत न आल्यास आमचे आशिल नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

माणगांव
ता. २२/०९/२०२६

सही/-
**श्री.पी.टी.मालोरे**
वकील,
रा.जे.बी.डी.प्लाझा, रुम नं.१३,
ता.माणगांव, जि.रायगड

## जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, आम्ही आमच्या क्लायंटच्या वतीने खालील व्यक्तींच्या स्पष्ट आणि विपणनक्षम हक्क, शीर्षक आणि स्वारस्याची तपासणी करत आहोत:

अ. (१) मनीषा सत्यम ओसवाल, रा. पार्श्व बंगला, जैन मंदिर रोड, डी. सी. नगर शिळफाटा, खोपोली, खालापूर, रायगड ४१०२०३, (२) राजेश दत्तात्रय परदेशी, रा. परळी सुधागड, रायगड - ४१०२०५, (३) अरुण पांडुरंग सकपाळ, रा. दुरशेत, खालापूर, रायगड - ४१०२०३, (४) सत्यम चंपकलाल ओसवाल, रा. पार्श्व बंगला, जैन मंदिर रोड, डी. सी. नगर शिळफाटा, खोपोली, खालापूर, रायगड - ४१०२०३, (५) सुभाष रामचंद्र सावंत, रा. वडवली, खालापूर, रायगड - ४१०२०३ आणि (६) संतोष पंढरीनाथ देशमुख, रा. ढोकशेत, सुधागड, रायगड ४१०२०५ यांचे खाली नमूद केलेल्या अनुसूची क्र. १ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेवरील (यापुढे 'सदर गट क्र. ४१५' असे संबोधले जाईल) हक्क, शीर्षक आणि स्वारस्य; आणि

ब. वसंत दत्तू केदारी, रा. दहिगाव, सुधागड, रायगड यांचे खाली नमूद केलेल्या अनुसूची क्र. २ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेवरील (यापुढे 'सदर गट क्र. ४१६' असे संबोधले जाईल) हक्क, शीर्षक आणि स्वारस्य.

सदर गट क्र. ४१५ आणि गट क्र. ४१६ यांचा यापुढे एकत्रितपणे 'सदर मालमत्ता' असा उल्लेख करण्यात येईल.

बँक आणि / किंवा वित्तीय संस्था आणि / किंवा प्राधिकरण यांच्यासह कोणत्याही व्यक्ती / संस्था यांना सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात विक्री, हस्तांतरण, विनिमय, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, गहाण, प्रभार, धारणाधिकार, वारसा, इच्छापत्रित दान, उत्तराधिकार, भेट, देखभाल, सुलभता अधिकार, ट्रस्ट, भाडेकरार, उप-भाडेकरार, लीव्ह अँड लायसन्स, काळजीवाहू म्हणून, ताबा, कब्जा, कौटुंबिक व्यवस्था / समझोता, कोणत्याही न्यायालयाची डिक्री किंवा आदेश, करार / समझोता किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, स्वारस्य, हिस्सा, दावा किंवा मागणी असल्यास, त्यांनी त्यासंबंधित कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी माहिती या नोटीशीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्यांना कळवावी. तसे न केल्यास, अशा प्रकारचा कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, स्वारस्य, हिस्सा, दावा आणि / किंवा मागणी, जर कोणतीही असेल, ती सोडून दिलेली आणि / किंवा त्यागलेली समजण्यात येईल आणि असा कोणताही दावा अस्तित्वात असल्याचे मानले जाणार नाही.

**अनुसूची क्र. १** ('गट क्र. ४१५')

ढोकशेत गाव, सुधागड तालुका, रायगड जिल्हा, महाराष्ट्र येथे, रायगड नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्ह्याच्या हद्दीत असलेली, गट क्र. ४१५ मधील २ हेक्टर ७ आर म्हणजेच अंदाजे २०,७०० चौ. मीटर क्षेत्रफळाची शेतजमीन.

**अनुसूची क्र. २** ('गट क्र. ४१६')

ढोकशेत गाव, सुधागड तालुका, रायगड जिल्हा, महाराष्ट्र येथे, रायगड नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्ह्याच्या हद्दीत स्थित असलेली, गट क्र. ४१६ असलेली, ३ हेक्टर आणि ७२ आर म्हणजेच अंदाजे ३७,२०० चौ. मीटर क्षेत्रफळाची शेतजमीन.

**दिनांक: २३ सप्टेंबर, २०२६**

सही/-
**शर्मन सी. परीख**, भागीदार
**जानी ॲण्ड परीख** करिता
**ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स**
३११, दलामल टॉवर, २११, फ्री प्रेस जर्नल रोड,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
ईमेलः sherman@janiparikh.in

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, अलिबाग

RDCC Bank Let's grow together

**-:निविदा सूचना :-**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,तर्फे दिपावली सणानिमित्त भेटवस्तू दिपावली भेटवस्तू खरेदी करणेची आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे भेटवस्तू खरेदी करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून निविदा मागविण्यांत येत आहेत.

तरी ज्या निविदाधारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या निविदा दिनांक ०१-१०-२०२६ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल.

कोणतेही कारण न देता कोणतीही अगर सर्व निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

केंद्र कार्यालय अलिबाग.
दिनांक :- २३-०९-२०२६

## जाहीर नोटीस

दिनांक : २३ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| रमेश यशवंत रौंधळ | ९२ | ० | ००-९४-१० | २ | ५० |
| | या पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-१५-०० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. अशोक मारुती कोकणे**
मो.नं. ७०५८७७८६५३
दिनांक :-२३/०९/२०२६

## जाहीर नोटीस

दि. २२/०९/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक प्रणया संतोष पिंगळे यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाची बोलणी आमच्या अशिलांच्या सोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| पेझारी ता.अलिबाग | ३/१/अ | ०-४९-३०<br>पो.ख ०-०७-३०<br>एकुण ०-५६-६० | ६.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी प्रणया संतोष पिंगळे यांच्या हिश्याचे एकुण क्षेत्र ०-०२-०० हे.आर. ही मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरिल मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालिल सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं. ७७४३८०९६५३

## जाहीर नोटीस

दिनांक : २३ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे सावळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| उमेश मदन पाटील | ३२ | ७ | ०-३५-०० | ० | १९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :- २३/०९/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक गजानन दामोदर भगत, बाबीबाई पंढरीनाथ पाटील, शोभा विजय पाटील, अनंता लक्ष्मण भगत, राजश्री चंद्रकांत पाटील, सुलोचना दामोदर भगत, अपर्णा राजेंद्र भगत, प्रधुम राजेंद्र भगत, आर्यन मुकुंद भगत, आयुष मुकुंद भगत अ.पा. क. आई आहुती, आहुती मुकुंद भगत, सरीता दिनेश भगत, प्रगती शाम पाटील, रसिका निलेश म्हात्रे, भारती भालचंद्र पाटील, विमल अवधुत भगत, ज्योती कैलास भगत, योगेश कैलास भगत, शितल कैलास भगत, मनिषा शेखर म्हात्रे, स्मिता प्रकाश पाटील, दिगंबर अवधुत भगत, निलेश अवधुत भगत, प्रज्ञा राजेंद्र भगत, चिंतामणी अवधुत भगत यांचेकडून खरेदी घेणेबाबत नोंदणीकृत साठेकरार केला आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे रांजणखार डावली, ता. अलिबाग येथील :-**

| मालकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|
| महेंद्र चंपालाल गांधी<br>सविता महेंद्र गांधी | ६१/११ | ००-३६-४० | १-२४ |
| | ६४/१ | ००-४२-२० | २-१२ |

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :-२३/०९/२०२६

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
''गुरुकृपा'',अलिबाग अर्बन
बँक शेजारी, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत वडखळ

**ई -निविदा सन २०२६-२७** (1st Call)

ग्रामपंचायत वडखळ ता.पेण कडील खालील कामांची निविदा योग्य त्या परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी खालील निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | लेखाशिर्ष | टेंडर फी रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | कंत्राटदार वर्गीकरण | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वडखळ हद्दीत अंगणवाडी क्र. १ व २ वर खोली बांधकाम करणे | रु.१४,९८,३७३/- | ग्रामनिधी | रु. ५९०/- | १४९८३/- | वर्ग ५ अ व त्यावरील | रायगड जि.प.कडील नोंदणीकृत खुला ठेकेदार |

सदर काम ग्रामपंचायत करण्यास तयार असतील तर ग्रामविकास व जलसंधारण विभागा कडील शासन निर्णय संकीर्ण/२०१०/२७५/ प्र.क्र.१७२/प.रा. ७ मंत्रालय, दिनांक १९ ऑक्टोबर २०११ मधील १(ब)(२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीने ई -निविदा कार्यपध्दतीनुसार काम करण्याचे आहे. त्यामुळे अन्य निविदाधारकांनी भरलेल्या निविदा रद्दबातल ठरविण्यांत येतील. याबाबत ई-निविदा पध्दतीने निविदा सादर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा रद्दबातल केल्याबाबत स्पष्टीकरण देण्यास ग्रामपंचायत बांधील राहणार नाही.

**निविदेचे वेळापत्रक**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. २३/०९/२०२६<br>दि. ०७/१०/२०२६ | १०.००<br>१७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. ०७/१०/२०२६ | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारीख | दि. ०९/१०/२०२६ | ११.०० |
| ई -निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | १ सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वडखळ | |

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

## ग्रुप ग्रामपंचायत वडखळ

**ई -निविदा सन २०२६-२७** (1st Call)

ग्रामपंचायत वडखळ ता.पेण कडील खालील कामांची निविदा योग्य त्या परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून Percentage rate tender दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी खालील निविदा बाबतची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | लेखाशिर्ष | टेंडर फी रक्कम रु. | इसारा रक्कम रु. | कंत्राटदार वर्गीकरण | आवश्यक कंत्राटदार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ग्रुप ग्रामपंचायत वडखळ हद्दीतील कचरा गोळा करणेचा ठेका देणे ग्रुप ग्रामपंचायत वडखळ ता. पेण | रु.२२,५५,७६०/- | ग्रामनिधी | रु. ११८०/- | २२५५७/- | - | रायगड जि.प.कडील नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था |

सदर काम ग्रामपंचायत करण्यास तयार असतील तर ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय संकीर्ण/२०१०/२७५/ प्र.क्र.१७२/प.रा. ७ मंत्रालय, दिनांक १९ ऑक्टोबर २०११ मधील १(ब)(२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीने ई -निविदा कार्यपध्दतीनुसार काम करण्याचे आहे. त्यामुळे अन्य निविदाधारकांनी भरलेल्या निविदा रद्दबातल ठरविण्यांत येतील. याबाबत ई-निविदा पध्दतीने निविदा सादर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा रद्दबातल केल्याबाबत स्पष्टीकरण देण्यास ग्रामपंचायत बांधील राहणार नाही.

**निविदेचे वेळापत्रक**

| तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| संकेतस्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि. २३/०९/२०२६<br>दि. ०७/१०/२०२६ | १०.००<br>१७.०० |
| ई- निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि. ०७/१०/२०२६ | १७.०० |
| ई- निविदा उघडणेची वेळ व तारीख | दि. ०९/१०/२०२६ | ११.०० |
| ई -निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | १ सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत वडखळ | |

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वडखळ**
**ता.पेण, जि.रायगड**

# निवडक

## गणेश मंडळातून मोबाईल लंपास

**पनवेल** : कामोठे सेक्टर ६ येथील गणेश मंडळात झोपलेल्या दोघांच्या उशाजवळ ठेवलेले दोन मोबाईल अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महेश कामठे आणि त्यांचे मित्र रमेश पोखरकर हे अॅडव्हान्स सोसायटी, सेक्टर ६, कामोठे येथील गणेश मंडळात झोपले होते. झोपण्यापूर्वी त्यांनी आपापले मोबाईल उशाजवळ ठेवले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात इसमाने सोसायटीच्या गेटमधून प्रवेश करून दोघांचे सुमारे ८० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल चोरून नेले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अनोळखी बेवारस इसमाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आजारी अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी बेवारस इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेनुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित इसम आजारी अवस्थेत आढळून आल्यानंतर पोलीस हवालदार केसरी भगवान पाटील यांनी त्याला उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.मयत इसमाचे वय अंदाजे ४० वर्षे असून, उंची सुमारे पाच फूट, सडपातळ शरीरयष्टी, काळी वाढलेली दाढी आणि काळे वाढलेले केस असे त्याचे वर्णन पोलिस नोंदीत करण्यात आले आहे. त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. या घटनेची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आला आहे.

## भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर

**पाली** : शहरात चिमुरडीवर भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेची दखल घेत शर्मिला बोडके यांनी पाली नगरपंचायतीला भेट देऊन नगराध्यक्ष पराग मेहता, उपनगराध्यक्ष सुलतान बेनसेकर आणि मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदन सादर केले. भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाबाबत तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. चिमुरडीवरील हल्ल्याची पुनरावृत्ती होऊ नये आणि नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, यासाठी नगरपंचायत प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता बोडके यांनी निवेदनातून मांडली. भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.पाली हे अष्टविनायक तीर्थक्षेत्र असल्याने स्थानिक नागरिकांसोबतच भाविकांचीही शहरात वर्दळ असते. अशा परिस्थितीत लहान मुले, पादचारी आणि भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवावर उपाययोजना होणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर बोडके यांनी नगरपंचायत पदाधिकाऱ्यांसमोर नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित केला आहे.

## इको टॉयलेटच्या माहितीसाठी सूचना फलकाची मागणी

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती असलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती श्रीवर्धन नगर परिषदेच्या माध्यमातून इको टॉयलेटचीनिर्मिती करण्यात आलेली आहे. सदर इको टॉयलेटचे लोकार्पण झाल्यानंतर काही दिवसानंतर हे टॉयलेट सुरू करण्यात आले आहेत. सदरचे टॉयलेट हे पूर्णपणे स्वयंचलित असून धुपप्रतिबंधक बंधाऱ्यावरील अन्य परिसरात देखील इको टॉयलेट बाबत माहिती देणारे सूचनाफलक असणे गरजेचे आहे. कारण अनेक वेळा अनेक पर्यटक अद्यापही या ठिकाणी स्वच्छतागृह कोणत्या ठिकाणी उपलब्ध आहे? असे स्थानिक नागरिकांना विचारताना आढळून येतात. वीज पुरवठा खंडित झाला असेल, तर हे इको टॉयलेट चालतात का? याबाबत देखील पर्यटकांना माहिती देणे गरजेचे आहे. इको टॉयलेटमध्ये प्रवेश करण्यासाठी नागरिकांना पाच रुपयाचे किंवा दहा रुपयाचे कॉईन त्या ठिकाणी असलेल्या बॉक्समध्ये टाकावे लागते. या बॉक्समध्ये कॉईन गेल्यानंतर या टॉयलेटचा दरवाजा ऑटोमॅटिक पद्धतीने उघडला जातो. आतमधील वीज पुरवठा व पंखे देखील सुरू होतात. त्यानंतर टॉयलेटमधून बाहेर आल्यानंतर पुन्हा आतमध्ये प्रवेश करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीला कॉइन टाकल्यानंतरच दरवाजा उघडला जातो. या ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर देखील सदर टॉयलेटची यंत्रणा सुरू असणार आहे का? याबाबतची माहिती देखील त्या ठिकाणी उपलब्ध असणे गरजेचे आहे. टॉयलेट कसा वापरावा याच्या सूचना टॉयलेटच्या दरवाजावरती मराठीमध्ये लिहिलेल्या आहेत. अशाच प्रकारचे सूचनाफलक समुद्रकिनाऱ्यावरती दोन ते तीन ठिकाणी लावणे गरजेचे आहे. मठाच्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावरती बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाच्या बाजूला कचऱ्याची प्रक्रिया करण्यासाठी एक टाकी बनवण्यात आली आहे. व या टाकी वरती दोन यंत्रे बसवण्यात आली आहेत. यामध्ये सुका कचरा व ओला कचरा अशा प्रकारची ती दोन यंत्रे आहेत. मात्र, ही सिस्टीम अद्यापपर्यंत सुरू करण्यात आलेली नाही.

# विसर्जनानंतर तळा तालुका सुना सुना

### भरलेल्या घरांना पुन्हा लागली कुलपे

| तळा | प्रतिनिधी |

गेले आठ दिवस तळा तालुक्यातील घराघरात चैतन्य ओसंडून वाहत होते. गणेशोत्सवामुळे बंद दरवाजे सताड उघडे झाले होते. एका घरातून दुसऱ्या घरात माणसांची वर्दळ, गल्लीभर दरवळणारा मोदकांचा गोड सुवास आणि अंगणात लहान मुलांचा किलबिलाट...हजारो चाकरमान्यांमुळे ओस पडलेली घरे बोलकी झाली होती. पण बाप्पाच्या विसर्जनानंतर तीच बोलकी घरे पुन्हा अबोल झाली. घरादारांना पुन्हा कुलपे लागली आणि गावात स्मशान शांतता पसरली. तळा तालुक्यात गणेशोत्सव आणि होळी हे दोन सण म्हणजे चाकरमान्यांची दिवाळीच असते.



यंदाच्या गणेशोत्सवातही चाकरमानी कुटुंबासह गावी आले. सारा गाव माणसांनी फुलून गेला. सगळी घरे प्रकाशमय झाली. कुठे ढोलकीचा नाद, कुठे भजनाचा स्वर, कुठे बाल्या नाच तर कुठे गाव विकासाच्या सभा. शेजारी-पाजारी आनंदाने एकमेकांच्या घरी जात होते. ते चित्र पाहून गावपण खऱ्या अर्थाने जगल्यासारखे वाटत होते. मात्र, विसर्जन होताच चित्र पालटले. विसर्जनानंतर रविवारी केलेल्या मटण रश्श्याचा सुवास विरेपर्यंत चाकरमान्यांनी मुंबई-पुण्याकडे परतीचा प्रवास सुरू केला. एसटीच्या ५३ विशेष गाड्यांमधून गावे रिकामी झाली. आता गावात उरली आहेत ती फक्त वयोवृद्ध माणसे आणि बंद घरांचा सुकसुकाट. हिच माणसे गावातच राहिली तर? हा प्रश्न आता वृद्धांच्या मनात घोळत आहे.

बाप्पाच्या आगमनामुळे रायगडच्या वेशीपासून ते थेट सिंधुदुर्गच्या टोकापर्यंतची नाती पुन्हा एकदा गावाकडच्या मातीशी घट्ट जोडली जात असून, अवघा कोकण प्रांत आता या महाउत्सवाच्या रंगात न्हाऊन निघण्यासाठी सज्ज झाला आहे. शासनाने या वृद्ध पालकांच्या आर्त हाकेकडे लक्ष देऊन ग्रामीण भागात रोजगाराचीनिर्मिती करावी, हीच आता वृद्ध आई-वडीलांचे बाप्पाला साकडे आहे.

### हाताला काम नाही

उद्योग नाही, व्यवसाय नाही. जोपर्यंत तळा तालुक्यात एखादा कारखाना, उद्योगधंदा येत नाही तोपर्यंत तरुणांना नोकरीसाठी मुंबई-पुण्याची वाट धरावीच लागणार. उद्योग आले तरच आमचा आनंद कायम टिकेल आणि गणेशोत्सवासारखी गावे वर्षभर फुललेली राहतील, अशी भावना ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.





● प्रितेश किशोर म्हात्रे, नवेदर नवगाव,



● गौरव गजानन थळे, पोस्ट - कुरूळ(पठार), अलिबाग, रायगड

# बेशिस्त वाहनांमुळे अपघाताचा वाढता धोका

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीमधील मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर अवजड वाहने बेशिस्तपणे उभी केली जात असल्याने येथील वाहतुकीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. रस्ते व्यापून उभ्या असलेल्या या वाहनांमुळे रोज लहान-मोठे अपघात होत असून, नागरिकांसह स्थानिक कामगारांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

औद्योगिक वसाहतीत दररोज शेकडो ट्रक, टँकर आणि ट्रेलरची ये-जा सुरू असते. मात्र, अनेक वाहनचालक आपले टँकर व अवजड वाहने थेट मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला अस्ताव्यस्तपणे उभी करतात. रस्त्याच्याकडेला लागलेल्या या वाहनांच्या लांबच लांब रांगांमुळे रस्ते अत्यंत अरुंद झाले आहेत. यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज न आल्याने वळणांवर अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.तसेच रात्रीच्या वेळी पुरेशा दिव्यांचा अभाव असल्याने रस्त्यात उभ्या असलेल्या या वाहनांवर आदळून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.



### नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

वसाहतीतील अंतर्गत रस्त्यांवरून प्रवास करताना कामगार, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडीच होत आहे. संबंधित प्रशासन, एमआयडीसी अधिकारी आणि वाहतूक पोलीस या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व कामगार संघटनांकडून केला जात आहे. कंपन्यांनी स्वतःच्या परिसरातच वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

धृतराष्ट्राची भूमिका घेणाऱ्या औद्योगिक विकास मंडळ प्रशासनाने या बेशिस्त पार्किंगवर तात्काळ कठोर कारवाई केली नाही आणि रस्त्यावरील ही धोकादायक वाहने योग्य ठिकाणी उभी केली गेली नाही तर येत्या काळात सर्व कामगार वर्ग एकत्र येऊन येथील कार्यालयावर मोर्चा घेऊन आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत आहे.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल संतोष पाटील यांचा सन्मान



| पनवेल | प्रतिनिधी |

सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले आणि शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेले रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक संतोष हरिभाऊ पाटील यांचा त्यांच्या सामाजिक व बँकिंग क्षेत्रातील कार्याची दखल घेत 'पनवेल टाइम्स'कडून सन्मान करण्यात आला.

हरिग्राम येथील संतोष पाटील यांनी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून संचालक म्हणून काम करताना ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांशी जोडलेले काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

### आरडीसीसीचे संचालक म्हणून केलेल्या कार्याची दखल

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष मा. आमदार जयंत पाटील, उपाध्यक्ष सुरेश खैरे, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक तसेच माजी आ. विवेक पाटील आणि मा. आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष पाटील कार्यरत आहेत. त्यांच्या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

# 'ट्री गार्ड' बनल्या कचरापेट्या

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

नवीन पनवेल सेक्टर १५ येथून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला झाडांच्या संरक्षणासाठी लावण्यात आलेले लोखंडी 'ट्री गार्ड' सध्या कचरा टाकण्याची जागा बनले आहेत. झाडांचे संरक्षण व्हावे आणि रस्त्याचे सौंदर्य वाढावे, या उद्देशाने बसविण्यात आलेल्या या ट्री गार्डमध्येच नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याचे चित्र दिसत आहे.

प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, खाद्यपदार्थांचे अवशेष आणि अन्य कचरा ट्री गार्डच्या आत साचत आहे. त्यामुळे झाडांभोवती अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले असून परिसराच्या सौंदर्यावर परिणाम होत आहे. रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या या मार्गावर नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र, रस्त्यालगतच कचरा साचल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. झाडांच्या संरक्षणासाठी उभारलेली सुविधा कचरा साठविण्यासाठी वापरली जात असल्याने महापालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. एकीकडे पनवेल महानगरपालिकेकडून स्वच्छता आणि शहर सुशोभीकरणासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

### 'स्वच्छ, सुंदर पनवेल'च्या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह

मात्र, दुसरीकडे सार्वजनिक ठिकाणी कचरा साचत असल्याने 'स्वच्छ, सुंदर पनवेल' ही संकल्पना केवळ कागदावरच आहे का?, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महापालिकेने या परिसराची तातडीने स्वच्छता करावी. तसेच ट्री गार्डमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मककारवाईकरावी, अशीमागणी होत आहे. कचरा टाकण्यासाठी योग्य ठिकाणी कचरापेट्या उपलब्ध करून देण्याची गरजही नागरिकांनी व्यक्त केली आहे. झाडे वाचविण्यासाठी उभारलेल्या ट्री गार्डचा उपयोग पुन्हा त्याच उद्देशासाठी व्हावा, यासाठी महापालिकेने ठोस उपाययोजना करावी, अशी अपेक्षा आहे.

## किराणा दुकानांमध्ये मद्य विक्री

**पनवेल** : चिंद्रणगाव किराणा दुकानात मद्य विक्री होत असल्याचा प्रकार समोर आला. अष्टविनायक किराणा स्टोअर्स असे असून, या दुकानदाराचे नाव प्रकाश पाटील असे आहे. पनवेल पोलिसांनी किराणा स्टोअर्समध्ये तपासणी केली असता ४ हजार ८६० रुपयांचा मुद्देमाल सापडून आला.





### दिवसभराची मजुरी सुटणेही झाले कठीण | काळाच्या ओघात कलेला उतरती कळा

# डबा, झाकण कारागिरांचा व्यवसाय नामशेष

| धाटाव | प्रतिनिधी |

गावोगावी आणि गल्लीबोळात फिरून ॲल्युमिनियम किंवा पत्र्याच्या डब्यांना झाकणे बसवून देणाऱ्या कारागिरांचा पारंपरिक व्यवसाय सध्या आता लोप पावत चालला आहे. यामुळे डबा, झाकण कारागिरांचा व्यवसाय नामशेष होण्याच्या मार्गावर असून गल्लीबोळात घुमणारी मडब्याला झाकण बसवून घ्याप ही हाक सुद्धा बदलत्या जमान्यात हळूहळू पूर्णपणे मौन झाल्याचे पाहावयास मिळत आहे.

पूर्वीच्या काळी घराघरांत धान्य, तेल, तूप आणि इतर किराणा सामान साठवण्यासाठी धातूचे मोठे डबे वापरले जात असत. वापरून वापरून या डब्यांची झाकणे खराब होणे, सैल होणे किंवा तुटणे अशा समस्या वारंवार निर्माण होत असत. अशा वेळी 'डब्याला झाकण बसवून घ्या' अशी हाक मारत गल्लीतून जाणारे कारागीर गृहिणींसाठी मोठे मदतगार ठरत असत. हे कारागीर स्वतःजवळ पत्र्याचे तुकडे, कात्री, हातोडी आणि सांधणीचे साहित्य घेऊन गावोगावी, गल्लोगल्ली फिरत असत. अत्यंत रास्त दरात आणि अगदी काही मिनिटांत हे कारागीर मंडळी आपल्या कल्पकतेने डब्याला अचूक आकाराचे झाकण तयार करून बसवत. मात्र, काळाच्या ओघात बदललेल्या जीवनशैलीमुळे या पारंपरिक व्यवसायाला उतरती कळा लागली आहे.



सध्या बाजारात ल्युमिनियम किंवा पत्र्याच्या डब्यांची जागा प्लास्टिक, फायबर आणि स्टेनलेस स्टीलच्या डब्यांनी घेतली आहे.प्लास्टिक आणि फायबरचे डबे वजनाने हलके,स्वस्त आणि आकर्षक रंगांत उपलब्ध असल्याने ग्राहकवर्गाने अशा साहित्याला अधिकाधिक पसंती दिली आहे. आधुनिक एर-टाईट डब्यांमुळे अन्नाला किंवा धान्याला कीड लागत नाही, ज्यामुळे जुन्या डब्यांचा वापर कमी झाला आहे.

प्लास्टिकचे डबे खराब झाल्यास ते दुरुस्त करण्याऐवजी थेट नवीन डबा खरेदी करण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. परिणामी, डब्यांना झाकणे बसवणाऱ्या या फिरत्या कारागिरांकडील कामाचे प्रमाण कमालीचे घटले आहे. दिवसभर पायपीट करूनही दिवसभराची मजुरी सुटणे कठीण झाल्याचे या व्यावसायिकांचे म्हणणे आहे. त्यातच वाढत्या महागाईने डोके वर काढल्यामुळे त्यातच कच्च्या मालाचे वाढलेले दर यामुळे हा व्यवसाय करणे कारागिरांना परवडने जोगे नाही. नवीन पिढीतील तरुणांनी या व्यवसायात रस न दाखवल्याने ही कला आता सुद्धा सध्या इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहे.

### छोटे व्यवसाय नष्ट

आधुनिकतेच्या आणि 'यूज अँड थ्रो' संस्कृतीच्या प्रभावामुळे अनेक पारंपरिक हस्तकला आणि छोटे व्यवसाय नष्ट होत आहेत. जुन्या वस्तूंची दुरुस्ती करून त्या दीर्घकाळ वापरण्याची मानवी वृत्ती आता हळूहळू कमी होत चालली आहे. यामुळेच एकेकाळी गल्लीबोळात घुमणारी मडब्याला झाकण बसवून घ्याप ही हाक आता हळूहळू पूर्णपणे मौन झाल्याचे दिसून येत आहे.

# मालकांना आली जाग

कॉर्पोरेट जगात ३६० अंशांतील विश्लेषण प्रसिध्द आहे. एखाद्या कर्मचाऱ्याची कामगिरी तपासायची असेल, त्याचा पगार किंवा बढती याविषयी ठरवायचे असेल तर पूर्वी केवळ त्याच्या वरिष्ठांचे मत विचारात घेतले जाई. पण सध्याची पध्दत अशी की त्याच्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांचे त्याच्याबद्दल काय मत आहे हेही तपासले जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सध्या अशीच मोहीम सुरू केली आहे. आयोगाने वाटेल तसा कारभार किंवा भानगडी करायच्या आणि बाकी सगळ्यांनी त्या सहन करायच्या असा आजवरचा प्रकार होता. त्यातून लोकसेवा आयोगाला विशेष दर्जा असल्याने त्याविषयी काही बोलायची चोरी होती. पण आयोगाच्या परिक्षांबाबत अलिकडे प्रचंड बोंबाबोंब झाली. औषधशास्त्र संदर्भातील एका परिक्षेचा पेपर फोडणाऱ्यांमध्ये आयोगातील कर्मचारी असल्याचे उघड झाले. अर्थात हे काही नवीन नाही. पूर्वीही असे प्रकार घडले आहेत. पण सध्या जंतरमंतरवरील झुरळांच्या आंदोलनानंतर वातावरण संतप्त आहे. जेन झींचे ऐकायला पाहिजे याची जाणीव सरकारला झाली आहे. ते नाही केले तर सत्ता जाऊ शकते याची जाणीव भाजपवाल्यांना झाली आहे. त्यामुळे या भरती परीक्षांसंदर्भात एक उच्चाधिकारी कृती गट किंवा समिती नेमण्यात आली आहे. व्ही राधा या सनदी अधिकारी त्याच्या प्रमुख आहेत. विविध परिक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे लोकसेवा आयोगाविषयी काय म्हणणे आहे हे जाणून घेण्यासाठी सध्या ही समिती ठिकठिकाणी फिरत आहे. पुणे, नाशिक, नागपूर, लातूर, संभाजीनगर इत्यादी शहरे आता लोकसेवा आयोगाच्या परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची केंद्र झाल्या आहेत. या ठिकाणी असंख्य क्लासेस चालतात, लाखो विद्यार्थी पेईंग गेस्ट म्हणून राहून कित्येक वर्षे या परिक्षांसाठी झगडतात. त्यातील फारच थोड्यांना यश मिळते. बाकीचे निराश होऊन माघारी गावाकडे जातात किंवा मग शहरांमध्ये बारीकसारीक कामे करत दिवस काढतात. समिती आजवर जिथे जिथे गेली तिथे तिच्यावर सूचनांचा पाऊस पडतो आहे. पेपरफुटीसंदर्भात सर्वाधिक तक्रारी आहेत. ही प्रकरणे जलदगती न्यायालयात चालवावीत, लोकसेवा आयोगात अधिकृत प्रवक्ता नेमावा, पेपरफुटी प्रकरणांचा तपास ठराविक दिवसात पूर्ण करावा अशा मुख्य सूचना आल्या आहेत व त्या अपेक्षित अशाच आहेत.

### विद्यार्थ्यांच्या मागण्या

मात्र आयोगाच्या कारभाराबाबत थेट त्याच्याशीच बोलण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांनी त्याची चांगलीच कानउघाडणी केली आहे. आयोगाच्या परिक्षांसाठी भरमसाठ शुल्क घेतले जाते. त्यातून शेकडो कोटी रुपये जमा होतात. त्या मानाने आयोग काहीच सुविधा उपलब्ध करीत नाही. खासगी बँका वगैरे आपल्या ग्राहकांच्या तक्रारींच्या नोंदणीसाठी सध्या एआयवर आधारलेली अत्याधुनिक यंत्रणा वापरतात. किमान काही कंपन्या व बँकांचा कारभार यामुळे सुधारलेला दिसतो. आयोगाकडे असे काहीही नाही. आयोगाच्या परिक्षांचे वेळापत्रक हा सर्वात मोठा तक्रारींचा विषय आहे. एसटी वा रेल्वेच्या गाड्यांप्रमाणे त्यात प्रचंड अंदाधुंदी आली आहे. मुंबईमध्ये सध्या वेस्टर्न व सेंट्रल रेल्वेचे वेळापत्रक पूर्णपणे बोंबललेले आहे. एकाही दिवशी एकही ट्रेन वेळेवर येत नाही. स्टेशनवर गेल्यावर जी कुठली गाडी येईल त्यात शिरायचा प्रयत्न करायचा एवढेच प्रवाशांच्या हाती राहिले आहे. लोकसेवा आयोगाच्या परिक्षांचीही हीच गत आहे. यांना कोणतेही वेळापत्रक नाही. त्या अचानक जाहीर केल्या जातात व अगदी शेवटच्या क्षणी रद्दही केल्या जातात. त्यामुळे या परिक्षांचे एक वार्षिक वेळापत्रक असावे व त्यात कोणताही बदल असेल तर पुरेसा आधी जाहीर करावा ही विद्यार्थ्यांची मुख्य मागणी आहे. भारत हा स्वतःला जगातील पाचव्या का सहाव्या क्रमांकाचा देश असल्याची जाहिरात करतो. आम्हाला प्रगत देश व्हायचे आहे असे सांगतो. या देशातील महाराष्ट्र हे राज्य तर स्वतःला आधीपासूनच प्रगत आणि पुढारलेले मानते. पण या राज्यातील लोकसेवा आयोगाला परिक्षा घेण्याचे कामही वेळेवर पार पाडता येत नाही ही स्थिती आहे. लाखो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागलेला असतो. ते दिवसरात्र अभ्यास करून तयारी करतात. आणि ऐन वेळी जाहीर केलेली परीक्षा रद्द होते. ती पुन्हा कधी होईल याची तारीखही दिली जात नाही. रद्द का केली याचेही कारण फालतू असते.

### राधा समितीकडून अपेक्षा

अनेकदा परीक्षांचा अभ्यासक्रम ऐन वेळी बदलला जातो. परीक्षा पध्दतीतही बदल केले जातात. नेमकी किती पदे भरली जाणार आहेत हे नीट सांगितले जात नाही. गेलेच तर पाळले जात नाही. परिक्षांचे निकाल वेळेवर येत नाहीत. आलेच तर मुलाखतींसाठी ताटकळत राहावे लागते. त्याही पार पडल्या तर नंतर त्यांचा निकाल येत नाही. तो आला तर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वेळेवर पदे मिळत नाहीत. त्यात संशयास्पद असे बदल होतात. समजा एकाच विद्यार्थ्याची दोन वेगवेगळ्या ठिकाणी निवड झाली तर त्याच श्रेणीतील प्रतीक्षायादीतील मुलांना योग्य रीतीने संधी मिळेलच याची शाश्वती नसते. त्याची रचना अपारदर्शक असते. त्यात पडद्याआड काही गडबडी होतात की काय असा संशय निर्माण होतो. वास्तविक या सर्वांची प्रचंड चर्चा झाली आहे. विद्यार्थ्यांनी त्याविषयी वेळोवेळी आंदोलने करून झाली आहेत. तरीही आता उच्चाधिकारी समिती हे नव्याने ऐकत असल्याप्रमाणे गावोगाव फिरून समजून घेत आहे. चांगले आहे. मात्र यातून काही ठोस उपाय निघाले तरच उपयोग आहे. अन्यथा हा निव्वळ उपचार ठरेल. उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, वैद्यकीय अधिकारी, जलसंपदा खात्यातील तांत्रिक अधिकारी ही महत्वाची पदे मानली जातात व अगदी डॉक्टर व इंजिनिअर असलेले तरुणही त्यांच्यासाठी तयारी करत असतात. अशा वेळी या परिक्षांना काही एक शिस्त असणे आवश्यक आहे. त्या त्या पदांची संख्या किती आहे हे पुरेसे आधीच जाहीर झाले तर विद्यार्थी नियोजन करू शकतात. या घोषणा वेळीच होत नसल्याने अनेक जण एकाच वेळी अनेक परिक्षांना बसत राहतात. तो त्यांचा त्रास टळू शकेल. लोकसेवा आयोग किंवा सरकार हे या मालक आहेत आणि विद्यार्थी हे काहीच किंमत नसलेले गुलाम आहेत अशी सध्याची व्यवस्था आहे. सरकार नोकरी देते आहे म्हणजे जणू या मुलांवर उपकार आहेत असा त्यातला सूर आहे. मुलांच्या गुणवत्तेच्या आधारे त्यांना यश मिळवून देणारी यंत्रणा असे या परिक्षांचे स्वरुप असायला हवे. प्रत्यक्षात त्यातील अनिश्चितता, आयोगाची मनमानी, बेदरकारी यामुळे या परिक्षांना लॉटरीचे रुप आले आहे. नशिबाने खैर केली, इश्वराची कृपा झाली तर या परिक्षांमध्ये तरुन जाता येऊ शकते. परीक्षा वेळेवर होणे, पेपर न फुटणे, निकाल लागणे आणि यश मिळणे हे सर्वच भगवान भरोसे. झालेल्या परिक्षा रद्द होणे, त्यांचे वाद कोर्टात जाणे, ऐन वेळी पदेच रद्द होणे हेही भगवंताच्या मर्जीवर. महाराष्ट्रासारख्या राज्यात ही असली भगवान भरोसे यंत्रणा असावी आणि तिच्यावर हवाला ठेवून या देशाचे भवितव्य असलेल्या २० ते ३० वयोगटातल्या कोट्यवधी तरुणांनी वर्षानुवर्षे आपली आयुष्ये बरबाद करावीत ही लाजिरवाणी बाब आहे. स्वतःला या मुलांच्या नशिबाचे मालक समजणाऱ्यांना आता जाग आली आहे हे चांगले आहे. आता राधा समितीच्या अहवालानंतर तरी काही बदल व्हावा ही आशा.

---

**विचार**

# गणेशोत्सवाचा खरा 'प्रसाद'!

**गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामूहिक जीवनाचा आरसा आहे. त्यात केवळ रोषणाईचे नव्हे, तर संस्कृती, सामाजिक बांधिलकी, पर्यावरणीय संवेदनशीलता आणि शिस्तीचे प्रतिबिंब दिसले, तरच सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा खऱ्या अर्थाने समृद्ध झाली असे म्हणता येईल. गणपती येतो, दहा दिवस राहतो आणि जातो; पण त्याने मागे ठेवलेली सामाजिक जाणीव वर्षभर टिकली पाहिजे. हाच गणेशोत्सवाचा खरा 'प्रसाद' ठरू शकतो.**

**मधुरा कुलकर्णी**

गणेशोत्सवाची चाहूल लागली, की महाराष्ट्रातील वातावरणच बदलून जाते. चौकाचौकात उभे राहणारे मंडप, रोषणाई, ढोल-ताशांचा निनाद, गणरायाच्या आगमनाची लगबग, सजावटीची तयारी, आरास, देखावे आणि विसर्जनाची धामधूम यामुळे संपूर्ण राज्यात एक वेगळे चैतन्य निर्माण होते. यंदाच्या गणेशोत्सव समोर उभा असून, गणेशमूर्तींच्या प्रतिष्ठापनेपासून मंडपांच्या सजावटीपर्यंत अनेक कामे शेवटच्या टप्प्यात आहेत; मात्र या उत्सवाकडे केवळ दहा दिवसांचा धार्मिक सोहळा म्हणून पाहण्याची वेळ आता मागे पडली आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जडणघडणीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकजुटीचे आणि जनजागृतीचे माध्यम बनवले, त्यामागे केवळ धार्मिक भावना नव्हती. समाजातील विविध घटकांनी एकत्र यावे, सार्वजनिक प्रश्नांवर चर्चा व्हावी, स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण व्हावी, या व्यापक हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाचा विस्तार झाला. आज परिस्थिती बदलली आहे. आता स्वातंत्र्यलढा नाही, समाजमाध्यमांचे युग आहे. मनोरंजनाची साधने असंख्य आहेत, तरीही सार्वजनिक गणेशोत्सवाचे सामाजिक महत्त्व कमी झालेले नाही. उलट, बदलत्या काळानुसार त्याला नवी दिशा देण्याची गरज निर्माण झाली आहे. अंतिम तयारीत उत्साहाबरोबर जबाबदारीही हवी.

गणेशोत्सव आता जल्लोशात सुरु होत आहे. मंडळांचे कार्यकर्ते रात्रंदिवस काम करत आहेत. मूर्तीची प्रतिष्ठापना, मंडप, विद्युत व्यवस्था, देखावे, सुरक्षा, वाहतूक नियोजन, स्वयंसेवकांची व्यवस्था अशा अनेक आघाड्यांवर तयारी सुरू आहे. या उत्साहाचे स्वागतच केले पाहिजे; पण उत्सव जितका मोठा, तितकी जबाबदारीही मोठी असते, हे लक्षात असू द्यावे.

या निमित्ताने काही महत्वाच्या पथ्यांची, अपेक्षांची उजळणी होणेही आवश्यक आहे. गणेशोत्सव साजरा करताना वाहतुकीचा खोळंबा होऊ नये, रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलासाठी मार्ग मोकळा राहावा, ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन व्हावे, सार्वजनिक जागेचा वापर विवेकाने व्हावा, विसर्जनामुळे जलस्रोतांचे प्रदूषण होऊ नये, याची काळजी मंडळांनी स्वतःहून घेणे आवश्यक आहे. 'उत्सव आमचा, त्रास दुसऱ्यांचा' ही मानसिकता सार्वजनिक उत्सवाच्या मूळ संकल्पनेशी विसंगत आहे. गणेशोत्सव हा धार्मिक श्रद्धेचा विषय असला, तरी त्याच्याशी जोडलेली आर्थिक उलाढालही प्रचंड आहे. मूर्तिकार, सजावटकार, मंडप उभारणारे कामगार, इलेक्ट्रिशियन, फुलविक्रेते, मिठाई विक्रेते, पूजा साहित्य विक्रेते, वाहतूकदार, ध्वनिव्यवस्था पुरवणारे, प्रकाशयोजना करणारे, खाद्यपदार्थ विक्रेते, लघुउद्योजक अशा असंख्य घटकांना या उत्सवातून रोजगार आणि उत्पन्न मिळते. मोठ्या शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत गणेशोत्सवामुळे स्थानिक बाजारपेठेला चालना मिळते. हजारो लहान व्यवसायांसाठी हा हंगाम महत्त्वाचा असतो. मंडळांच्या माध्यमातून स्थानिक कलाकारांना, कारागीरांना आणि तंत्रज्ञांनाही संधी मिळते. त्यामुळे गणेशोत्सवाची आर्थिक बाजू दुर्लक्षित करता येणार नाही; मात्र या आर्थिक उलाढालीचे रूपांतर स्थानिक रोजगार, स्थानिक उत्पादन आणि स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन देण्यात झाले, तर उत्सवाची आर्थिक शक्ती अधिक अर्थपूर्ण ठरेल. केवळ महागडी सजावट आणि दिखाऊपणावर पैसा खर्च करण्यापेक्षा काही निधी सामाजिक उपक्रमांसाठी राखून ठेवण्याची परंपरा अधिक व्यापक व्हायला हवी.

यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषण आणि लेझर लाईटचा मुद्दा विशेष चर्चेत आहे. गणेशोत्सव म्हणजे ढोल-ताशे, संगीत आणि जल्लोष हे मान्य; पण आवाजाची तीव्रता आणि कालमर्यादा यांचा विचार न करता उत्सव साजरा करण्याला सार्वजनिक उत्सवाचे समर्थन देता येणार नाही. ध्वनिप्रदूषणाचा त्रास केवळ आजारी किंवा वृद्ध व्यक्तींनाच होतो असे नाही. विद्यार्थी, लहान मुले, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि प्राण्यांवरही होतो. त्याचप्रमाणे शक्तिशाली लेझर लाईटचा अनियंत्रित वापर हा केवळ सौंदर्याचा प्रश्न नाही. वाहनचालकांच्या दृष्टीवर त्याचा परिणाम होऊ शकतो; डोळ्यांसाठीही धोका निर्माण होऊ शकतो. म्हणूनच प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करावी; पण त्याचबरोबर मंडळांनीही स्वनियंत्रणाचा आदर्श घालून द्यावा. कायद्याच्या भीतीने आवाज कमी करण्यापेक्षा सामाजिक जाणीवेतून आवाज मर्यादित ठेवल्यास उत्सवाची प्रतिष्ठाच वाढेल. उत्सवातील आनंद दुसऱ्याच्या शांततेच्या किंमतीवर मिळवण्याची गरज नाही. गणेशोत्सवाचा सर्वात महत्त्वाचा आणि अनेकदा दुर्लक्षित राहिलेला पैलू म्हणजे कार्यकर्त्यांची जडणघडण. मंडळाच्या माध्यमातून अनेक तरुण प्रथमच संघटन, नियोजन, निधी संकलन, कार्यक्रम आयोजन, जबाबदारीचे वाटप, संकट व्यवस्थापन आणि लोकांशी संवाद शिकतात. एखादा मंडप उभारणे ही केवळ सजावटीची प्रक्रिया नसते. त्यामागे नियोजन असते. शेकडो लोकांना एकत्र आणणे, वेळेचे नियोजन करणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे, परवानग्या घेणे, प्रशासनाशी संवाद साधणे, मतभेद सोडवणे, कार्यक्रम यशस्वी करणे या सगळ्या प्रक्रियेतून तरुणांना प्रत्यक्ष व्यवस्थापनाचे धडे मिळतात. याच अर्थाने गणेश मंडळे ही तरुणांसाठी लोकशाहीची प्राथमिक शाळा ठरू शकतात.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात अनेक कार्यकर्त्यांची जडणघडण गणेश मंडळातूनच झाली आहे. लोकांमध्ये मिसळणे, त्यांच्या समस्या समजून घेणे, कार्यक्रम आयोजित करणे, प्रशासनाशी संवाद साधणे आणि संकटाच्या वेळी पुढे होऊन काम करणे या गुणांचा विकास गणेशोत्सवाच्या माध्यमातून होतो. म्हणून गणेशोत्सवाकडे 'नेते घडवणारी कार्यशाळा' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे; मात्र नेतृत्व म्हणजे केवळ राजकीय पद किंवा निवडणूक जिंकणे नव्हे. परिसरातील पाणी, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, वाहतूक, महिला सुरक्षा अशा प्रश्नांसाठी काम करणारा तरुणही नेता असतो. गणेश मंडळांनी अशा सामाजिक नेतृत्वाला प्रोत्साहन दिले, तर उत्सवाचे रूप अधिक व्यापक होईल. मंडळांनी तरुणांना केवळ वर्गणी गोळा करणे आणि कार्यक्रम आयोजित करणे शिकवू नये. समाजासाठी काम करणे आणि सार्वजनिक जबाबदारी स्वीकारणेही शिकवावे. गणेशोत्सवाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचे सांस्कृतिक स्वरूप. महाराष्ट्राची लोककला, संगीत, नाटक, चित्रकला, शिल्पकला, लोकपरंपरा आणि सामाजिक इतिहास यांचे दर्शन घडवण्यासाठी गणेशोत्सव हे प्रभावी व्यासपीठ ठरू शकते. आज अनेक मंडळे देखावे उभारतात. त्यात ऐतिहासिक, सामाजिक किंवा पर्यावरणविषयक विषय मांडले जातात. या परंपरेला अधिक सर्जनशील दिशा देण्याची गरज आहे. स्थानिक कलाकारांना संधी, लोककलांना व्यासपीठ, मुलांसाठी सांस्कृतिक स्पर्धा, व्याख्याने, पुस्तक प्रदर्शन, नाट्यप्रयोग, संगीत मैफिली आणि सामाजिक विषयांवरील चर्चासत्रे यामुळे गणेशोत्सव खऱ्या अर्थाने सांस्कृतिक महोत्सव होऊ शकतो.

गणेशोत्सवाची व्याप्ती केवळ मनोरंजनापुरती मर्यादित राहू नये. मनोरंजनासोबत प्रबोधन आणि प्रबोधनासोबत संस्कृतीचे संवर्धन हा त्याचा नवा मंत्र असायला हवा. आजची तरुण पिढी डिजिटल जगात वाढली आहे. त्यामुळे गणेशोत्सवानेही आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करायला हवा. देणगीची पारदर्शक ऑनलाइन व्यवस्था, डिजिटल माहिती फलक, गर्दी व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक सजावट आणि सामाजिक उपक्रमांचे डिजिटल दस्तऐवजीकरण अशा अनेक गोष्टी करता येतील. मंडळांनी आपल्या खर्चाचा आणि देणग्यांचा हिशेब सार्वजनिक केला, तर पारदर्शकता वाढेल. वर्गणीच्या बाबतीत दबाव किंवा सक्ती टाळली, तर गणेशोत्सवाबद्दल समाजात अधिक विश्वास निर्माण होईल. गणेशोत्सव मोठा होण्याची स्पर्धा सुरू राहिली, तर मंडप, रोषणाई, ध्वनी आणि सजावटीवरील खर्च वाढतच जाईल; पण उत्सव किती मोठा असावा यापेक्षा तो किती अर्थपूर्ण असावा, याची चर्चा व्हावी. एखाद्या मंडळाने एका गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणाला मदत केली, एखाद्या गावात वृक्षारोपण केले, रक्तदान शिबीर घेतले, स्थानिक कलाकारांना संधी दिली, परिसर स्वच्छ ठेवला किंवा एखाद्या सामाजिक समस्येवर जनजागृती केली, तर ते अधिक अर्थपूर्ण साजरीकरण मानायला हवे. गणराय बुद्धी, विवेक आणि सद्बुद्धीचे प्रतीक आहे. त्यामुळे गणेशोत्सव साजरा करताना विवेक हरवणे हा गणरायाच्या पूजेचा विरोधाभासच ठरेल.

यंदाचा गणेशोत्सव जोमाने सुरू होत असताना महाराष्ट्राने एक नवा संकल्प करायला हवा. उत्सव साजरा करू पण प्रदूषण न करता, जल्लोष करू पण दुसऱ्याला त्रास न देता, पैसा खर्च करू पण त्यातून समाजालाही काही देऊ. तरुणांना एकत्र आणू पण त्यांच्यातून जबाबदार कार्यकर्ते आणि संवेदनशील नेते घडवू, असा हा नवसंकल्प असू शकतो.

---

**चर्चा आजची**

# खराब रस्त्यांमुळे धुळीचे साम्राज्य

**वैभव पाटील**



पाऊस थांबताच रस्त्यावर विविध ठिकाणी रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांतील कोरड्या चिखलामुळे निर्माण झालेल्या धुळीच्या त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच या प्रदूषणामुळे आजाराचा धोका वाढला आहे. रस्त्यांवरील पडलेल्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ पसरू लागली आहे. पावसाळ्यामध्ये माती टाकून खड्डे बुजवल्याने ही धुळ परिसरात पसरू लागली आहे. तसेच, वाहतूक कोंडी होत आहे. बऱ्याच मार्गावर माती, खडी टाकून खड्डे बुजविण्याचा दिखावा करण्यात आला. रस्त्यावर तात्पुरती लावलेली मलमपट्टीदेखील उखडल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीत रस्त्यावरील खड्डे चुकवत प्रवास करणाऱ्या नागरिकांना आता धुळीचा त्रास साहन करत आहे. उखडलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्यामुळे रस्त्यावरून मोठे वाहन गेल्यानंतर मागून जाणाऱ्या दुचाकी चालकाच्या नाका-तोंडात धूळ जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभारामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. रस्त्यांचे काम मागील चार ते पाच वर्षापासून प्रलंबित आहे. या रस्त्याचे काम अपूर्ण स्थितीत आहे. पावसाळ्यात माती, खडी टाकून खड्डे बूजविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभामार्फत करण्यात आले. पावसाळ्यात चिखलातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली होती. अलिबाग वडखळ रस्त्यांवर वाहनांची वर्दळ आहे. या उखडलेल्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठीही कसरत करावी लागत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या वर्दळीमुळे रस्त्यांवरील खडी मातीची धुळ उडत आहे. रस्त्यावर काही काळ थांबल्यास संपूर्ण धूळ अंगावर थराप्रमाणे साचत असून याच दरम्यान श्वसनातून शरीरात धूळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांचे आजारी होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र आहे. या धुळीचे कण अनेकांच्या नाका तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. दुचाकी चालकासह तीन चाकी, चार चाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि पादचारी प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे. धुळीच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. या धुळीमुळे ॲलजी तसेच श्वसनाच्या विकाराची लागण होत असून, त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होत आहे. शहरातील वर्दळीच्या प्रमुख रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनामुळे धूळ उडताना दिसून येते. या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती न केल्यास धुळीचा प्रश्न कायम राहील. रस्त्यांवरील खड्डयांमध्ये मातीमिश्रीत मुरुम टाकला जात असल्यामुळे आणखीनच धुळीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवर चष्म्याविना किंवा तोंडाला दुपट्टा न बांधता वाहन चालवणे अवघड झाले आहे. यामुळे अपघाताला एकप्रकारे निमंत्रण दिले जात आहे. धुळीमुळे वातावरण दूषित होत असून, प्रदूषित हवेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. धुळीमुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत असून, प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहे. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

धूळ श्वासावाटे शरीरात जाते. त्यानंतर धूलिकण श्वसनात जमा होतात. हे धूलिकण श्वसनातून शरीरात, फुफ्फुसात, श्वसननलिकेत जातात. अँलर्जीचा त्रास होणाऱ्यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर काहींना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होत जाणे होय. विविध सणानिमित्ताने खरेदीसाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी नागरिकांची ये-जा सुरु झाली आहे. तसेच पर्यटकही त्यांच्या वाहनांमधून या मार्गावरून प्रवास करीत आहेत. परंतु मातीचे कण व धुळीमुळे प्रवास करणे नकोसे झाले आहे. वारंवार मागणी करूनही या रस्त्याच्या कामाचा वेग प्रशासनाकडून वाढवला जात नसून या रस्त्यासाठी अनेकदा आंदोलनेदेखील केली आहेत. मात्र, तरीही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांची या जाचातून कधी सुटका होणार, असा प्रश्न त्रस्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

---

**लोकसंसद**

## उत्सवाच्या आनंदावर दुःखाचे विरजण

गणेशोत्सव हा खरे तर अवघ्या महाराष्ट्राच्या, विशेषतः मुंबईकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आणि आनंदाचा सण. बाप्पाच्या आगमनाने संपूर्ण शहर उत्साहात असतानाच, गेल्या काही दिवसांत मुंबईत घडलेल्या एका पाठोपाठ घडलेल्या दुर्दैवी घटनांनी प्रत्येक संवेदनशील मुंबईकराचे मन विषण्ण झाले आहे. १७ सप्टेंबरला लालबागच्या राजाच्या चरणस्पर्श रांगेत उभ्या असलेल्या २५ वर्षीय जयदीप नेमाडे या तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने झालेला मृत्यू, १८ सप्टेंबरला आयआयटी मुंबईच्या कॅम्पसमध्ये २० वर्षीय साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या आत्महत्येची घटना आणि २० सप्टेंबरला पहाटे काळाचौकी येथील महागणपती उत्सव मंडळाच्या मंडपाबाहेर विजेच्या उघड्या तारांमुळे लागलेल्या शॉकने एका ८ वर्षीय चिमुकलीसह ३३ वर्षीय महिलेचा गेलेला निष्पाप बळी अत्यंत वेदनादायी आहे. त्याच दिवशी कोस्टल रोडवर भरधाव बीएमडब्ल्यू कारच्या भीषण अपघातात ३ तरुणांना आपले प्राण गमवावे लागले. ऐन उत्सवाच्या काळात अशा घटना घडल्यामुळे उत्सवाच्या रांगेतील गर्दीचे नियोजन, विद्युत सुरक्षा आणि तरुण पिढीच्या मानसिक आरोग्याबाबत मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. प्रशासनाने आणि सार्वजनिक मंडळांनी यातून धडा घेऊन सुरक्षेचे कडक उपाय योजणे गरजेचे आहे, जेणेकरून भविष्यात आनंदाच्या उत्सवाला असे दुःखाचे गालबोट लागणार नाही.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# सांकेतिक भाषांचा आंतरराष्ट्रीय दिवस



'वर्ल्ड फेडरेशन ऑफ द डे' च्या म ते, जगात ७ कोटींहून अधिक कर्णबधिर लोक आहेत. त्यापैकी सुमारे ८० टक्के विकसनशील देशांमधील आहेत. ते सुमारे ३०० वेगवेगळ्या सांकेतिक भाषा वापरतात. संयुक्त राष्ट्रांनी सांकेतिक भाषांना पूर्णपणे विकसित नैसर्गिक भाषा म्हणून परिभाषित केले आहे, ज्या बोलल्या जाणाऱ्या भाषांपेक्षा संरचनात्मकदृष्ट्या वेगळ्या आहेत. भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी २३ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस कर्णबधिर लोकांच्या जीवनासाठी सांकेतिक भाषा किती आवश्यक आहे याची जाणीव वाढविण्यास देखील मदत करेल. हा उत्सव २०१७ च्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या ठराव मधून उद्भवतो, जो २३ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणून ओळखतो. संयुक्त राष्ट्रांनुसार, हा दिवस स्थापन करणाऱ्या ठरावात हे मान्य केले आहे की सांकेतिक भाषेत उपलब्ध असलेल्या दर्जेदार शिक्षणासह सांकेतिक भाषेतील सांकेतिक भाषा आणि सेवांमध्ये लवकर प्रवेश मिळणे हे कर्णबधिर व्यक्तीच्या वाढीसाठी आणि विकासासाठी म हत्त्वाचे आहे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य केलेल्या विकास उद्दिष्टांच्या साध्यतेसाठी महत्त्वाचे आहे. २३ सप्टेंबरची निवड १९५१ मध्ये 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ द डे'ची स्थापना झाल्याच्या तारखेचे स्मरण करते. २०१८ मध्ये पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताहाचा भाग म्हणून सांकेतिक भाषा दिन साजरा करण्यात आला. तेव्हापासून, दर २३ सप्टेंबर हा सांकेतिक भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. कर्णबधिर लोकांच्या मानवी हक्कांच्या पूर्ण जाणीवेमध्ये सांकेतिक भाषेचे महत्त्व जागरूकता निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने २३ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन म्हणून घोषित केला आहे. 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ द डे' ही जगातील अपंग व्यक्तींच्या सर्वात जुन्या आंतरराष्ट्रीय संघटनांपैकी एक आहे. जगभरातील कर्णबधिरांना पूर्ण प्रवेशयोग्यता, समान मानवी हक्क आणि त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभाग घेण्यास अडथळे येतात हे ओळखून, 'वर्ल्ड फेडरेशन ऑफ द डे' ची स्थापना २३ सप्टेंबर १९५१ रोजी रोम, इटली येथे करण्यात आली. १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धापासून संयुक्त राष्ट्र आणि त्याच्या एजन्सींशी सहयोग करत आहे. आज, त्यांचे सामान्य सदस्य पाच खंडांमधील १२५ देशांचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय सांकेतिक भाषा ही भारतातील कर्णबधिर समुदायाची मूळची एक नैसर्गिक दृश्य-मॅन्युअल भाषा आहे आणि ती कर्णबधिर आणि श्रवण समुदाय दोन्ही वापरतात. सांकेतिक भाषा ही बहिरे आणि कर्णबधिर लोकांच्या संवादासाठी एक महत्त्वाची साधने आहे. ती केवळ संवाद साधण्याचे माध्यम नसून, सांस्कृतिक ओळख आणि अधिकारांचे प्रतीक आहे. आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिनानिमित्त विविध कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये सांकेतिक भाषेचा प्रसार आणि तिच्या महत्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट असते. या दिवसामुळे समाजात समावेशकतेची भावना वाढीस लागते आणि प्रत्येक व्यक्तीला त्याच्या अधिकारांची जाणीव होते.

## पान १ वरून

## हुतात्म्यांची अवहेलना!

चिरनेर जंगल सत्याग्रहावर ब्रिटिश सरकारने बेछूट गोळीबार केला. या हल्ल्यात धाकू बारक्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (चिरनेर), रघुनाथ मोरेश्वर न्हावी (कोप्रोली), रामा बामा कोळी (मोठी जुई), आनंदा माया पाटील (धाकटी जुई), परशुराम रामा पाटील (पाणदिवे), हसूराम बुधाजी घरत (खोपटा) आणि आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे) या आठ सत्याग्रहींनी बलिदान दिले, तर ३८ आंदोलक जखमी झाले.

या हुतात्म्यांचा इतिहास भावी पिढीपर्यंत पोहोचावा म्हणून शासनाने त्यांच्या मूळ गावी स्मारके उभारली. मात्र, स्मारके उभारून शासनाची जबाबदारी संपली का? देखभाल-दुरुस्तीसाठी निधी नसल्याने आज या स्मारकांची अवस्था पाहण्यासारखी झाली आहे.

या स्मारकांची देखभाल कोणत्या विभागाने करायची, यावरून ग्रामपंचायत, उरण पंचायत समिती आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जबाबदारी झटकली जात असल्याचे चित्र आहे. परिणामी, हुतात्म्यांच्या स्मृतींची ही स्थळे दुर्लक्षित राहिली आहेत.

काही स्मारकांवरील पत्रे उडाली आहेत, काही ठिकाणी सिलिंग कोसळले आहे. गुरेढोरे आणि भटक्या कुत्र्यांसाठी ही स्मारके आसरा बनली आहेत. ज्यांच्या बलिदानामुळे देशाला स्वातंत्र्याचा श्वास मिळाला, त्यांच्या स्मारकांवर आज अशी वेळ यावी, यापेक्षा दुर्दैवी बाब कोणती?

दरवर्षी चिरनेर येथील मुख्य स्मारकाजवळ हुतात्म्यांना अभिवादनाचा कार्यक्रम होतो. त्यामुळे त्या स्मारकाची डागडुजी केली जाते. मात्र, इतर गावांतील स्मारकांकडे वर्षभर ढुंकूनही पाहिले जात नसल्याने त्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे.

## रायगड रोपवे दोन महिने बंद

रोपवे कंपनीचे व्यवस्थापक राजेंद्र खातू यांनी पर्यटकांनी पायरी मार्गाचा वापर करताना पाणी, योग्य पादत्राणे आणि आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकार असलेल्या पर्यटकांनी पायरी मार्गाचा वापर करताना विशेष काळजी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. रोपवे सेवा बंद राहणार असल्याने रायगडला भेट देणाऱ्या पर्यटकांनी प्रवासाचे नियोजन करताना या बदलाची नोंद घ्यावी, असे व्यवस्थापनाने सांगितले आहे.

## कोयना धरण परिसरात भूकंपाचे धक्के

या भूकंपांचे केंद्र साताऱ्यापासून सुमारे ५० ते ५२ किलोमीटर अंतरावर होते.

दरम्यान, कोयनानगर येथील भूकंप मापन केंद्र सध्या बंद असल्याने भूकंपाच्या केंद्रबिंदूचे अचूक अंतर, खोली तसेच अक्षांश-रेखांशाची नोंद होऊ शकली नाही. कोयना परिसर भूकंपप्रवण क्षेत्र असून, येथे यापूर्वीही लहान-मोठे भूकंपाचे धक्के बसले आहेत. सध्या परिस्थिती सामान्य असल्याची माहिती देण्यात आली.

## राज्यकर्ते कायद्यापेक्षा स्वत:ला मोठे मानतात

शेतकरी सहभागी झाले होते. यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना महाजन बोलत होत्या.

मोर्चादरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी परत मिळाव्यात, अशी जोरदार मागणी केली. प्रांत कार्यालय परिसरात मोठ्या संख्येने शेतकरी जमा झाल्याने काही काळ परिसरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी मोर्चाला संबोधित करताना समाजसेविका उल्का महाजन यांनी सेझच्या नावाखाली संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या प्रश्नावर राज्य सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. कायद्यानुसार पेण, पनवेल आणि उरण तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी २००६ च्या सुमारास सेझसाठी संपादित करण्यात आल्या. काही गरजू शेतकऱ्यांनी त्या काळात विविध आश्वासने आणि आमिषांच्या आधारे आपल्या जमिनी रिलायन्सकडे दिल्या. मात्र ज्या उद्देशाने या जमिनी घेण्यात आल्या, तो उद्देश पूर्ण झालेला नाही, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या जमिनी, त्यांचे हक्क आणि भविष्यातील उपजीविका याबाबत शासनाने स्पष्ट भूमिका घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. अनेक वक्त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या मागण्यांसाठी एकजुटीने लढा देण्याचे आवाहन केले.

मोर्चानंतर शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी प्रांत कार्यालयात वैयक्तिक स्वरूपात हरकती दाखल केल्या. हरकती दाखल करण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी रांग लागली होती. दूरवरून आलेल्या शेतकऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली भूमिका प्रशासनासमोर मांडली.

दरम्यान, आंदोलनात शेतकऱ्यांनी जमिनी आमच्या हक्काच्या, नाही कुणाच्या बापाच्या; आमच्या जमिनी आम्हाला परत करा, अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सेझसाठी गेलेल्या जमिनींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आल्याने प्रशासन आता याबाबत कोणती भूमिका घेते, याकडे शेतकरी आणि परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## वायशेतमध्ये लाखोंचा अवैध दारुसाठा

दारुसाठा आढळून आला. त्यामध्ये मॅकडॉनोल्ट, इंपिरिअल ब्लू, डीएसपी ब्लॅक या विदेशी दारुसह जीएम कंपनीच्या देशी दारुच्या बाटल्यांचा समावेश आहे. तसेच एम.एच. ०६ सी.पी. ४३९२ या क्रमांकाच्या पिकअप गाडीमध्ये पाच लाख १७ हजार ७१८ रुपयांचा ऐवज आढळून आला. एकूण पाच लाख २९ हजार १७३ रुपयांचा दारुचा साठा तसेच पाच लाख रुपयांची गाडी असा एकूण दहा लाख २९ हजार १७३ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. या गुन्ह्यातील दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. यामध्ये वायशेतमधील सुशील पाटील आणि महावीर चौकमधील राहुल राजपूत यांचा समावेश असून, त्यांच्या विरोधात अलिलाबग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## पतीनेच रचला घरफोडीचा बनाव!

आई कृष्ण जन्माष्टमीच्या उत्सवासाठी बाहेर गेले होते. घरी परतल्यानंतर बेडरूममधील कपडे अस्ताव्यस्त, कपाटे व ड्रॉव्हर उघडे तसेच बाथरूमच्या खिडकीच्या काचा काढलेल्या आणि पोटमाळ्यावरील खिडकी तोडलेली आढळल्याचे त्याने सांगितले होते. पत्नीने कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरल्याची तक्रार त्याने केली होती. याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सहाय्यक फौजदार संदेश सानप तपास करीत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सूरज पाटील व त्यांचे पथक तसेच नागोठणे पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. त्यात घरफोडीचा बनाव करून दागिने स्वतःच लपवून ठेवल्याचे निष्पन्न झाले. जप्त केलेल्या मुद्देमालात १२ तोळ्यांची सोन्याची गंठण, दोन तोळ्यांचा सर, दोन तोळ्यांची चैन, तीन तोळ्यांची चैन आणि तीन तोळ्यांचा हार अशा एकूण ६ लाख ६० हजार रुपये किमतीच्या दागिन्यांचा समावेश आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, रोहाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रभारी अधिकारी सपोनि रवींद्र पारखे, पोउनि सूरज पाटील यांच्यासह पोलिसांच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

प्रवासाला जाताना घरात दागिने किंवा मोठी रोकड ठेवू नये. मौल्यवान वस्तू बँक लॉकरमध्ये ठेवाव्यात, बाहेरगावी जाताना विश्वासू शेजाऱ्यांना कल्पना द्यावी, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि घराच्या परिसरात पुरेसा प्रकाश ठेवावा. संशयास्पद व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांशी किंवा ११२ हेल्पलाईनवर संपर्क साधावा. घरातील नोकर, चालक, सुरक्षा रक्षक व भाडेकरू यांची पोलीस पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन नागोठणे पोलिसांनी केले आहे.

## पाण्यासाठी चिमुकलेच बनले रिपोर्टर!

पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची धावपळ सुरू आहे. शाळकरी मुलांच्या दैनंदिन जीवनावरही त्याचा परिणाम होत आहे. नेमका बिघाड कुठे आहे, जलवाहिनीची समस्या आहे की अन्य तांत्रिक अडचण, याची तातडीने पाहणी करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

पाण्यासाठी मोठ्यांनी आवाज उठवला; आता चिमुकल्यांनीही सवाल केला. 'घरात पुराचे पाणी येऊ शकते, तर पिण्याचे शुद्ध पाणी का येऊ शकत नाही?' या एका प्रश्नात गावकऱ्यांची संपूर्ण व्यथा दडली आहे. चिमुकल्यांना पाण्यासाठी हातात फलक घेऊन सरकारला जागे करण्याची वेळ येणे, ही केवळ वढावची समस्या नसून, मूलभूत सुविधांच्या अंमलबजावणीवर विचार करायला लावणारी परिस्थिती आहे.

## शिक्षक पतपेढी वादाच्या भोवऱ्यात

सुमारे पाच कोटी रुपयांची थकबाकी असून, नोकरदारांच्या पगारावर चालणाऱ्या पतसंस्थेसाठी एवढी थकबाकी गंभीर असल्याचा दावा करण्यात आला आहे.

लेखापरीक्षणासाठी आकारली जाणारी फीसुद्धा अवास्तव असल्याचा आरोप करण्यात आला असून, २९ ऑक्टोबर २०१४च्या शासन निर्णयानुसार फी आकारण्याची मागणी सभासदांनी केली आहे. विविध त्रुटी निदर्शनास आणूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

सभासदांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर पतपेढीच्या संचालक मंडळाने लेखी आश्वासन दिले आहे. ताळेबंदातील जुना हस्तलिखित फरक २९ डिसेंबर २०२६पूर्वी शोधून तफावत रक्कम जिल्हा विशेष लेखापरीक्षण सहकारी संस्था आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सादर केली जाईल, असे पतपेढीने स्पष्ट केले आहे.

तफावत रकमेस जबाबदार व्यक्तींविरोधात कारवाई करण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. तसेच २७ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेत थकबाकी वसुलीसंदर्भात कठोर कारवाईचा ठराव घेण्यात येणार आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार २०२५-२६ या आर्थिक वर्षाची लेखापरीक्षण फी देण्यात येईल, तसेच शासनाने फीबाबत सुधारणा केल्यास त्याचे पालन केले जाईल, असेही संचालक मंडळाने लेखी कळविले आहे.

दरम्यान, वार्षिक सर्वसाधारण सभेत चर्चा करून सभासद आणि संचालक मंडळातील सदस्यांची समिती गठीत करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर मंगळवारचे ठिय्या आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

# बेलापूर रेल्वे स्टेशन अंधाराच्या गर्तेत



- सिडकोचे दुर्लक्ष
- महिला, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

बेलापूर रेल्वे स्थानक आणि परिसर सध्या गंभीर समस्यांचा सामना करत असून, आग्रोळी, आयकर कॉलनीकडून प्लॅटफॉर्म क्रमांक १ च्या बाजूने तिकीट काउंटरकडे जाणारा परिसर अंधाराच्या गर्तेत सापडला आहे. सिडको प्रशासनाच्या सततच्या दुर्लक्षामुळे दररोज प्रवास करणाऱ्या हजारो रेल्वे प्रवाशांना, विशेषतः महिला व विद्यार्थिनींना मोठ्या भीतीच्या सावटाखाली प्रवास करावा लागत आहे. अशातच अंधाराचा फायदा घेऊन येथे गुन्हेगारी किंवा अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

बेलापूर रेल्वे स्थानकातील मुख्य तिकीट काउंटरकडे अर्बन हट आणि बेलापूर रेल्वेस्टेशनच्या मधून जाणारा रस्ता पूर्णपणे अंधारात बुडालेला आहे. या रस्त्यावरून दररोज मोठ्या संख्येने प्रवासी ये-जा करतात. इतकेच नव्हे, तर प्लॅटफॉर्म क्रमांक १ वरून बाहेर पडून अग्रोली आणि आयकर कॉलनीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावरही पथदिवे बंद असल्याने भीषण अंधार पसरलेला असतो. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष देऊन प्रवाशांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी आता सर्वसामान्य नागरिक आणि प्रवाशांमधून केली जात आहे.

### दिवे आहेत, पण प्रकाश शोधण्याची वेळ!

स्थानक परिसरात आणि रस्त्यांवर जे मोजके पथदिवे (स्ट्रीट लाईट्स) बसवले आहेत, त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. दिव्यांमधून मिळणारा प्रकाश इतका मंद आणि नावालाच आहे की स्ट्रीट लाईटचे दिवे व त्यांचा प्रकाश शोधण्याची वेळ आली आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. अंधाराचा फायदा घेऊन येथे गुन्हेगारी किंवा अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. नियोजित शहरातील मुख्य रेल्वेस्टेशनमध्ये ये-जा करण्यासाठी रेल्वे प्रवाशांना मोबाईलच्या प्रकाशाचा वापर करावा लागत आहे.

### अभियंता विभागाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

प्रवाशांनी मागणी केल्यानंतर आणि सातत्याने तक्रार केल्यानंतर सिडको प्रशासनाने या ठिकाणच्या रस्त्यावर मागील पावसाळ्यानंतर डांबरीकरण केले होते. परंतु वर्षभराच्या कालावधीतच या रस्त्यावर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. यामुळे सिडकोच्या अभियंता विभागाच्या दर्जावर देखील प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ सप्टेंबर

१) श्री.अशोक मधुकर डोळस
मु.कुरूळ, अलिबाग
दि.२३-०९-१९४६

२) श्रीम.प्रणिता प्रमोद गुरव
चेंढरे-अलिबाग
दि.२३-०९-१९५६

३)श्रीम.प्रतिभा वसंत पाठक
राममंदिर जवळ, अलिबाग
दि दि.२३-०९-१९६४

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै.दामोदर धर्मा पाटील, स्मरणार्थ अलिबाग



## Tender Notice

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/FUSE WIRE/T-08/2026-27 | Contract for Supply OF Tinned Copper Fuse Wire of various ratings | 2.00 | 2,000/- | 500+18% GST= 590/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 23.09.2026 to Dt. 30.09.2026. Submission of Bid is up to Dt. 01.10.2026 till 18.15 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.- Raigad-402103.

PRO no. 098

**Executive Engineer, Goregaon Division**

## सार्वजनिक सूचना

ही सूचना सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते की आमच्या ग्राहकांनी शेतजमीन मिळकतीचे मालक श्री. बंडू काशिनाथ राठोड श्रीमती रिया बंडू राठोड यांच्याकडून शेतजमीन मिळकती खरेदी केली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**मौजे- तुकसई, तालुका- खालापूर, जिल्हे - रायगड, वर्ग - १**

| सर्वे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्रफळ (हे आर.चौ.मी.) | | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १५/२/अ | ००-२७-६६ | खाता क्र. ४०३ | ०.२० |
| १५/२/ ब | ००-८३-०० | खाता क्र. ३३८ | ०.५५ |
| १४/२/ ब | ००-२३-०० | खाता क्र. ३३८ | २.६५ |
| | एकूण १३३.६६ गुंठे | | |

कोणत्याही व्यक्तीस वरील नमूद केलेल्या शेतजमीन विक्री, विनिमय, तारण, भार, भेट, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हक्क, परवाना, हायपोथिकेशन, मालकी हक्काचा हस्तांतरण, कोणत्याही ट्रस्टखालील लाभदायी हक्क, प्रिएम्पशन हक्क, प्रथम खरेदी हक्क, करार, डिक्री, आदेश, निर्णय किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा, आक्षेप, स्वारस्य किंवा वाद असल्यास त्यांनी त्यांचे दावे/आक्षेप/वाद याबाबतची कागदपत्रे सादर करून या सूचनेच्या प्रकाशनापासून चौदा (१४) दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्याशी संपर्क साधावा. अन्यथा आमचे क्लायंट वरील मालकाशी व्यवहार पूर्ण करतील आणि नंतर कोणताही तृतीय पक्षाचा दावा/आक्षेप/वाद विचारात घेतला जाणार नाही.

Mr. Vishal Singh
For M/s V R legal & Co

कार्यालय क्र. २२५, थापर कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ५१, सेक्टर- १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

संपर्क : +९१-९९२०३९०९५९

ईमेल आयडी : adv. vrlegal@gmail.com

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**ई-लिलाव सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. कडून व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत असून तो आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर खालील वेळापत्रकानुसार प्रकाशित करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | कराराचे नाव | करारांची / लॉट्सची संख्या | ई-लिलावाची दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| 1 | मडगाव – मंगळुरू सेंट्रल – मडगाव (10107/10108) मेमू ट्रेन तसेच दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) ट्रेनमध्ये अंतर्गत जाहिरातींचे प्रदर्शन | 02 | 28/09/2026 रोजी 11:00 वाजता |
| 2 | दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) या ट्रेनच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन | 03 | 29/09/2026 रोजी 11:00 वाजता |
| 3 | रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात होर्डिंग्सद्वारे जाहिरात | 08 | 30/09/2026 रोजी 11:00 वाजता |
| 4 | रेल्वे स्थानकांवर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात, रत्नागिरी, मडगाव, थिविम, करमळी, कारवार, मुर्डेश्वर मुल्की, उडुपी स्थानकांवर होर्डिंग्स तसेच थिवीम येथे व्हिडिओ वॉल | 09 | 01/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 5 | थिविम व करमळी येथील एफओबी वर जाहिरात फलकांद्वारे जाहिराती, करमळी स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे जाहिरात आणि मडगाव येथे आवाराच्या सीमाभिंतीवर जाहिरात | 04 | 03/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 6 | चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड़, होन्नावर, भटकळ आणि सुरतकल या स्थानकांवर डिजिटल लॉकर बसविणे | 08 | 29/09/2026 रोजी 11:00 वाजता |
| 7 | माणगाव, कोलाड, आडवली, विलवडे, उडुपी, थिविम, मडगाव, होन्नावर आणि अंकोला या स्थानकांवर भाडे पुनरावृत्ती दर्शक बसविणे. | 05 | 05/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 8 | एसएलआरचे लीजिंग – गाडी क्रमांक 11004, 20112, 10104, 10215, 22907, 56615-II. | 06 | 05/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 9 | गोकर्ण रोड़ येथे सशुल्क वाहनतळाची सुविधा. | 01 | 06/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 10 | मडगाव येथे प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके) | 01 | 06/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 11 | मडगाव येथे पार्सल स्कॅनर | 01 | 07/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 12 | माणगाव, चिपळूण, कुन्दापुरा, मूकांबिका रोड बैन्दूर, थिविम, थिविम-2, कारवार, करमळी येथे पैसे देऊन वापरण्याची शौचालय सुविधा. | 08 | 07/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 13 | रत्नागिरी व उडुपी येथे दुचाकी पॅकिंगचा कंत्राट | 02 | 08/10/2026 रोजी 11:00 वाजता |
| 14 | करमळी येथे हॉलिडे होमची सुविधा | 01 | 21/10/2026 रोजी 11:00 वाजता |

**चौकशीसाठी कृपया संपर्क साधा:** 1. श्री. राजेश रेडीज, मोबाईल क्र. 7020553377, 2. श्री. विनय गावंकर, मोबाईल क्र. 9004476129, 3. श्री. मधुकुमार शेट्टी, मोबाईल क्र. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळास भेट द्या.

**मुख्य वाणिज्य व्यवस्थापक
कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**

सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस डॉ. शैलेश बाबाराम सुर्वे, राहणार - २७०१/०४, ओडीसी-२, ऑर्चर्ड अव्हेन्यू, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई- ४०००७६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) दर्शन लालजी चौधरी २) पंकज भुराभाई पटेल ३) वसंत देवजी पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ठ भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ४२५२ | १०/९/२०२६ | पुष्पक नोड | २८ | ६७ | ४२०.०० चौ.मी. | १०/४/२०२६ | २०/४/२०२६ २४/४/२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२३४/२०२६-२७

# निवडक




## पुई येथे शिक्षकांचा गुणगौरव सोहळा

**कोलाड :** श्री. क्षेत्रपाल मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ, पुई यांच्या वतीने तसेच श्री.प्रमोद अनंत म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान पुरस्कृत सार्वजनिक गणेशोत्सवाचे औचित्य साधून परिसरातील शिक्षकांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला. अध्यक्ष प्रमोद म्हसकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी कोलाड पीएसआय भरत फारणे, मंडळाचे संस्थापक अनंत सानप, विठ्ठल पवार, सचिन लहाने, हरिचंद्र कदम, मंगेश सानप, उत्सव कमिटी अध्यक्ष सचिन दिसले, लक्ष्मण पवार, चंद्रकांत फाटे, डॉ. सागर सानप, दिनकर सानप, समीर पडवळ, विश्वास लहाने, अजित लहाने, संदेश मोहिते, संदीप शिर्के, विनायक सानप, मंगेश लहाने, मंगेश वाघावळे, नरेश लहाने, हरेश महाडिक, पंकज लहाने, राजेंद्र कदम आदी प्रमुख यावेळी उपस्थित होते. स्थानिक पातळीवर तळागाळातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या तसेच सामाजिक व शैक्षणिक विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन ते यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला.



## पालीतील नागरिक आक्रमक

**पाली :** पाली शहरातील बुरुडआळीकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर आदिवासी महिलांची मासे विक्री आणि दुतर्फा होणाऱ्या अनधिकृत वाहन पार्किंगमुळे भीषण वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. यासंदर्भात पाली नगरपंचायतीचे नगराध्यक्ष पराग मेहता यांची भेट घेऊन समस्यांचा पाढा वाचत तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. बुरुडआळी मार्गावर दररोज आदिवासी महिला मासे विक्रीसाठी बसत असल्याने आणि याच ठिकाणी शिस्तहीन पद्धतीने वाहने पार्क केली जात असल्याने पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे. याचा सर्वाधिक फटका आपत्कालीन सेवांना बसत असून, रुग्णाला नेण्यासाठी रुग्णवाहिका किंवा स्थानिकांची वाहने जाण्यास जागाच उरत नाही. यापूर्वीदेखील स्थानिक नागरिकांनी या गंभीर समस्येकडे नगरपंचायतीचे लक्ष वेधण्यासाठी वेळोवेळी लेखी पत्रव्यवहार केला होता. मात्र, नगरपंचायत प्रशासनाने अद्याप यावर कोणतीही ठोस दखल अथवा कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

## श्वेतराज काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**चणेरा :** कवयित्री संध्या दिवकर यांच्या पहिल्या श्वेतराज कविता संग्रह प्रकाशनाचा सोहळा रोहा येथील ज्येष्ठ नागरीक सभागृहात संपन्न झाला. रोहा नगरपरिषद कै. प्रफुल्लशेठ बारटके मंगलवाडी शाळा क्रमांक १० येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या संध्या दिवकर ह्या उत्तम कवयित्री आहेत, आहेत. अनेक वर्षे काव्यलेखन करीत असून कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहाच्या विद्यमान अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. रांगोळी, चित्रकला, बाहुली नाट्य, गायन, उत्कृष्ट सुत्रसंचालन, पारंपरिक गीते संकलन, आगरी कविता आणि गजल लेखन छंद जोपासणाऱ्या संध्या दिवकर यांच्या पहिल्या श्वेतराज काव्य संग्रहाचे प्रकाशन ना अदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविकात विजय दिवकर यांनी केले, पुस्तक परीचय रायगड भूषण सुखद राणे यांनी केले. श्वेतराज या पुस्तकातील काही निवडक कवितांचे या प्रसंगी वाचन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा वनश्री शेडगे यांनी संध्या दिवकर उपक्रमशील शिक्षिका आहेत. त्यांच्या वर्गातील विद्यार्थी उत्तम कविता करतात हेही माहित होते. परंतू त्या उत्तम कवयित्री असून आज त्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन होतेय ही फार आनंदाची गोष्ट आहे, असा गौरव शेडगे यांनी केला.

## ओएनजीसी कामगारांमध्ये असंतोष

**उरण :** ओएनजीसी कंपनीतील १७ कंत्राटी कामगारांना अचानक कामावरून कमी करण्यात आल्याने कामगारांमध्ये संतापाचे वातावरण आहे. या निर्णयाविरोधात सुमारे ६०० कामगारांनी गेल्या सहा दिवसांपासून बेमुदत संप पुकारला असून कंपनीसमोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला न्हावा ग्रामस्थांनीही पाठिंबा दिला असून मोठ्या संख्येने ग्रामस्थ आंदोलनात सहभागी झाले आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी न्हावा येथे आंदोलनस्थळी भेट देऊन कामगारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी कामगारांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी पूर्ण ताकदीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. महेंद्रशेठ घरत म्हणाले, ओएनजीसीचे न्हावा येथील प्रशासन कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे. कंत्राटी कामगारांना कायम करण्याऐवजी त्यांना कामावरून कमी करणे आणि ठेकेदारांना प्राधान्य देणे योग्य नाही. ऐन गणेशोत्सवात कामगारांना रस्त्यावर उतरावे लागणे ही गंभीर बाब आहे. मात्र, विघ्नहर्ता गणेश कामगारांवरील हे संकट दूर करेल. कामगारांच्या पाठीशी मी पूर्ण ताकदीने उभा राहणार आहे.न्हावा ग्रामस्थांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून आंदोलनाला एकजुटीने पाठिंबा दिला आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४
- अलिबाग एस.टी. स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पनवेलमध्ये डेंग्यूच्या संशयित रुग्णांत वाढ

## घरोघरी ताप सर्वेक्षणाचा महापालिकेचा निर्णय

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरियाच्या संशयित तसेच लागण झालेल्या रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे महापालिकेने घरोघरी ताप सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. जानेवारी ते २१ सप्टेंबरपर्यंतच्या आकडेवारीनुसार, महापालिकेच्या नोंदीत डेंग्यूचे ४२३, तर मलेरियाचे ६२२ रुग्ण आढळले. खासगी रुग्णालये आणि रक्त तपासणी प्रयोगशाळांकडून मिळालेल्या माहितीनुसार संशयित व लागण झालेल्या डेंग्यू रुग्णांची संख्या ७८२, तर मलेरियाची संख्या ८०३ वर आहे.

महापालिका क्षेत्रात आरोग्यवर्धिनी केंद्र, आपला दवाखाना आणि उपआरोग्य केंद्र अशी २७ आरोग्य केंद्रे आहेत. याशिवाय २२३ खासगी




रुग्णालये आणि ४१ रक्त तपासणी प्रयोगशाळा आहेत. या २६७ खासगी वैद्यकीय आस्थापनांकडून साथरोगांबाबतची माहिती म हापालिकेला दिली जाते. जानेवारी ते ऑगस्टदरम्यान खासगी आस्थापनांच्या माहितीनुसार डेंग्यूचे ३७७, तर मलेरियाचे १८१ संशयित रुग्ण आढळले.

महापालिकेच्या २७ वेगवेगळ्या आरोग्य केंद्रांमध्ये जानेवारी ते ऑगस्टदरम्यान ३,९५९ जणांची डेंग्यू एन-१ एलायजा तपासणी करण्यात आली. त्यापैकी २९८ जणांना डेंग्यूची लागण झाल्याचे आढळले. सप्टेंबरच्या २१ दिवसांत ६११ तपासण्या करण्यात आल्या असून, त्यापैकी १२५ रुग्ण आढळले. एकंदरीच साडेआठ महिन्यांत ४,५७० तपासण्यांमध्ये ४२३ रुग्ण आढळले.

मलेरियासाठी जानेवारी ते ऑगस्टदरम्यान १ लाख १ हजार ८३० जणांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ४८० रुग्ण आढळले. सप्टेंबरच्या २१ दिवसांत ९,३७९ तपासण्यांत १४२ रुग्ण आढळले. एकूण १ लाख ११ हजार २०९ तपासण्यांत ६२२ रुग्ण आढळले. आयुक्त मंगेश चितळे यांनी वैद्यकीय आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन मंगळवारपासून घरोघरी ताप सर्वेक्षण, कंटेनर सर्वेक्षण आणि टेरेस तपासणी सुरू करण्याचे निर्देश दिले. यासाठी बहुउद्देशीय कर्मचारी आणि नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मदत घेतली जाणार आहे. डासांची उत्पत्तीस्थाने आढळल्यास प्रतिबंधक औषध फवारणी तसेच धूरफवारणी केली जाणार आहे. बांधकामस्थळे, झोपडपट्ट्या, शाळा, औद्योगिक व अन्य उच्च जोखीम क्षेत्रांची नियमित तपासणी केली जाते. नागरिक, गृहनिर्माण संस्था व बांधकाम व्यावसायिकांना सूचना व आवश्यकतेनुसार नोटिसा दिल्या जातात. शाळा, महाविद्यालये व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती केली जाते. खासगी रुग्णालये व प्रयोगशाळांकडून रुग्णांची माहिती घेऊन तातडीने कार्यवाही केली जाते.

### कार्यवाहीचा दावा

**संशयित रुग्णांची रक्त तपासणी करून त्वरित निदान व उपचार केले जात आहेत. रुग्ण आढळलेल्या भागात नागरिकांची तपासणी केली जाते. घरगुती व सार्वजनिक ठिकाणी डासांची उत्पत्तीस्थाने शोधून नष्ट केली जात आहेत. पाणी साचणाऱ्या ठिकाणी अँटी-लार्वल औषधांची फवारणी, आवश्यकतेनुसार गप्पी किंवा गॅम्बुशिया मासे सोडणे आणि रुग्ण आढळलेल्या भागात फॉगिंग केले जात आहे.**

> **डेंग्यू हा विषाणूजन्य आजार आहे. या आजारात तापाचे प्रमाण कमी जास्त होते. हाडदुखी वाढल्यास महापालिकांच्या आरोग्य केंद्रात यावर उपचार व तपासण्या मोफत केल्या जातात. वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा उगाचच घाबरून जाऊ नये. खर्चीक बाबी टाळाव्यात.**
>
> **- डॉ. आनंद गोसावी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पनवेल महापालिका**

# बैलचोरीतील आरोपी गजाआड

- **रोहा पोलिसांच्या धाडसी कारवाई**
- **तांत्रिक विश्लेषणातून गुन्ह्याची उकल**

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बैलचोरीच्या गुन्ह्याचा छडा लावताना रोहा पोलिसांनी दाखवलेल्या धाडसाचे आणि तपास कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. गुन्ह्यातील संशयित आरोपीचा शोध घेण्यासाठी रोहा पोलिसांचे पथक थेट मुंब्रा परिसरात पोहोचले आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन रोह्यात आणण्यात यश मिळवले.

रोहा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध बैलचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले. त्यामध्ये दिसणाऱ्या




संशयित इसमाची गुप्त बातमीदारांमार्फत माहिती घेण्यात आली. त्यातून संशयित इसम हा फजल आयुब कुरेशी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर त्याचा मोबाईल क्रमांक मिळवून तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून पोलिसांनी त्याच्या हालचालींचा माग काढला. वरिष्ठांच्या आदेशानुसार १७ सप्टेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल बेल्हेकर, पोलीस शिपाई चाळेकर, पोलीस शिपाई पाटील आणि चालक पोलीस हवालदार झावरे यांचे पथक मुंब्रा येथे रवाना झाले. मुंब्रा हा रोहा पोलिसांसाठी अपरिचित आणि जोखमीचा परिसर असतानाही पथकाने स्थानिक मुंब्रा पोलिस ठाणे तसेच रायगड सायबर पोलिसांच्या मदतीने आरोपीचा शोध सुरू ठेवला. अखेर १८ सप्टेंबर रोजी आरोपीचा ठावठिकाणा निश्चित करून त्याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले.विशेष म्हणजे हा आरोपी विविध गुन्ह्यामध्ये पोलीस रेकॉर्डला असल्याने तो त्याचा राहण्याचा ठावठिकाणा नेहमी बदलत होता. पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारांसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने बैलचोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे. आरोपीला पुढील तपासासाठी अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला २३ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

# कृषी विभाग शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सरसावला

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

अलनिनोच्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य दुष्काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी सोनपेठ तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील ३२ तांत्रिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे.

सामाजिक बांधिलकी जपत या सर्वांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचा स्वेच्छेने घेतला आहे. महाराष्ट्र राज्य कृषी दुष्काळाच्या दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी सोनपेठ तालुक्यातील कृषी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्याचा स्वेच्छेने निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे कौतुक होत आहे. शेतकरी हा कृषी विभागाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे संकटकाळात प्रशासकीय जबाबदारी सोबतच सामाजिक दायित्व जपणे आमचे कर्तव्य आहे. अशी भावना महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. अधिकारी व कर्मचारी शेती योजनाची अंमलबजावणी व मार्गदर्शना सोबतच संकट काळातही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असल्याची माहिती, कृषी सेवा महासंघाच्या वतीने देण्यात आली.

# पनवेल औद्योगिक वसाहतीच्या रस्त्यांची चाळण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल औद्योगिक सहकारी वसाहतीमधील सेवा रस्त्याचे काम चार महिन्यांपूर्वीच करण्यात आले होते, मात्र अल्पावधीतच या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत.

वसाहतीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, हे काम एमआयडीसीने केले असून, काम अपूर्ण असल्याने रस्ता अजून वसाहतीकडे हस्तांतरित झालेला नाही, असे स्पष्ट करण्यात आले.जे. जे. वूड ते खांदा कॉलनीदरम्यानच्या मुख्य रस्त्यावर खड्डे पडल्याने या मार्गावरील वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे.

शासनाच्या उद्योग विभागाच्या ७५:२५ योजनेअंतर्गत तसेच एम आयडीसीच्या माध्यमातून पनवेल औद्योगिक वसाहतीतील रस्ते, गटारे आणि अन्य पायाभूत सुविधांच्या कामांसाठी तब्बल २२ कोटी ३९ लाख ५१ हजार ५०० रुपयांचा निधी मंजूर केला आहे. कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देऊन रस्त्यांची कामे केली असतानाही अवघ्या चार महिन्यांत रस्त्यांवर खड्डे पडल्याने गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

## विष्णू पाटील यांचे निधन

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

विष्णू पाटील यांचे राहत्या घरी धाकटे शहापूर येथे दि.२१ रोजी निधन झाले.मृत्यू समयी त्याचे वय ८५ वर्ष होते.तरुण वयात म्हसोबा क्रीडा मंडळाची स्थापना केली. कबड्डीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय खेळाडू निर्माण केले व त्यांना चांगल्या नोकऱ्या देखील मिळवून दिल्या. नऊ गाव खारेपाट कृती समिति व श्रमिक मुक्ती दलाचे ते कार्यकर्ते होते.



# आठ दिवसानंतरही आरोपी मोकाट

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

सुतारवाडी परिसरातील धगडवाडी या गावातील एका महिलेला अज्ञात इसमाने रात्रीच्या वेळी काठी व धारदार हत्याराने मारहाण केली. यामध्ये महिला जखमी झाली असून तब्बल आठ दिवस झाले तरी आरोपी सापडला नाही. या प्रकरणाने महिला वर्गात घबराट पसरली आहे. महिलेवरील हल्ला हा निंदनीय असून आम्ही आरोपीचा शोध लावणार असल्याचे कोलाड पोलिसांनी सांगितले.

महिला घराच्या मागील बाजूस असलेल्या वाड्यामध्ये रात्री आठ वाजता भांडी घासत होती. याच वेळी एक इसम




त्या ठिकाणी मागील बाजूच्या दिशेने येऊन हातातील काठीने महिलेच्या कानावर जोराचा फटका मारला व दुसऱ्या हातात असणाऱ्या हत्याराने महिलेच्या हातावर व बोटावर वार करून जखमी केले. त्या ठिकाणाहून त्याने पळ काढला. या प्रकरणाने परिसरातील महिला वर्गात घबराट पसरली असून सदर घटनेची फिर्याद कोलाड पोलिसात दाखल केली आहे.यातील इसम हा चोरीच्या उद्देशाने आला नव्हता. कुठलाही अनुचित प्रकार त्याने केला नाही. मग नेमका मारहाण करण्याचा उद्देश काय असा प्रश्न कोलाड पोलिसांना पडला आहे.

### धगडवाडी महिला मारहाण प्रकरण

या परिसरात हॉटेल्स रिसॉर्ट राफ्टींग खूप मोठ्या प्रमाणात सुरू असून परप्रांतीयदेखील या परिसरात आले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून देखील हा प्रकार घडू शकतो असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# ठाणा नाका पुलाखाली क्रीडांगण सज्ज

**। खांदा । वार्ताहर ।**

खांदा कॉलनी आणि पनवेलच्या ठाणा नाक्याला जोडणाऱ्या रेल्वे पुलाखालील मोकळ्या जागेचा उपयोग करून पनवेल महानगरपालिकेने मुला-मुलींसाठी क्रीडांगण विकसित केले आहे. या ठिकाणी बास्केटबॉलसह दोन स्वतंत्र क्रीडांगणे तयार करण्यात आली आहेत. मैदानाचे काम पूर्णत्वाकडे आले असले तरी अद्याप त्याचे अधिकृत लोकार्पण झालेले नसल्याने नागरिक आणि



स्थानिक खेळाडूंमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

बास्केटबॉलसह तयार करण्यात आलेल्या दोन्ही मैदानांचा वापर स्थानिक खेळाडूंना सरावासाठी करता येणार आहे. मात्र, मैदान तयार झाल्यानंतरही ते नागरिकांसाठी खुले करण्यात आले नसल्याने लोकार्पण कधी होणार? असा सवाल स्थानिक खेळाडूंकडून उपस्थित केला जात आहे. महापालिकेने मैदानाची पाहणी करून आवश्यक त्या सुविधा पूर्ण कराव्यात आणि लवकरात लवकर अधिकृत लोकार्पण करून मैदान खेळाडूंसाठी खुले करावे, अशी मागणी होत आहे.

# अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कराडे खुर्द गावाजवळील दिव्या अँड अँटिलिया बिल्डिंग परिसरात एका बेवारस इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. संबंधित इसमाची ओळख पटलेली नसून, त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी रसायनी पोलिसांकडून माहिती प्रसिद्ध केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास दिव्या अँड अँटिलिया बिल्डिंग परिसरातील झाडाखाली एकजण मृतावस्थेत आढळून आला. इसमाचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे असून, त्याचे नाव व पत्ता अद्याप समजू शकलेला नाही.याप्रकरणी पंचनामा करण्यात आला असून, शवविच्छेदनही करण्यात आले आहे.

**विविध कामांसाठी १३६.७६ कोटींचा निधी मंजूर | रायगडच्या हजारो मच्छिमारांना लाभ**

# करंजा बंदराच्या विकासाला मिळणार गती

**। उरण । प्रतिनिधी ।**

करंजा बंदराच्या विकासासाठी शासनाने १३६.७६ कोटींचा निधी मंजूर केला आहे. यामुळे गेल्या दोन वर्षांपासून गाळाच्या समस्येमुळे त्रस्त असलेल्या मच्छिमारांना दिलासा मिळणार आहे.

करंजा बंदरातील बोटींच्या प्रवेश मार्गावरील गाळ काढणे, अतिरिक्त रुंदीकरण, ३७० मीटर अतिरिक्त लांबीची धक्का भिंत अशा विविध विकासकामांसाठी राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाने १३६.७६ कोटींचा निधी मंजूर केला आहे. येत्या नोव्हेंबर महिन्यापासून या कामाला सुरुवात होणार आहे. मच्छिमारांना भेडसाविणारी बंदरातील महत्त्वाची गाळाची व अतिरिक्त धक्काभिंतींची समस्या



दूर होणार असल्याने रायगडच्या हजारो मच्छिमारांना याचा लाभ होणार आहे.

करंजा मच्छिमार बंदरातून मासेमारी हंगामात ५५० कोटी किमतीच्या मासळीची निर्यात होते. मात्र करंजा बंदरात मागील दोन वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर साचलेल्या गाळामुळे मच्छिमार अडचणीत आले आहेत. गाळामुळे हजारो मच्छिमारांना ओहोटीच्या वेळी बंदरात मासळी उतरवून पुन्हा जाण्यासाठी बंदरातच चार ते सहा तासांपर्यंत वाट पाहावी लागते. यामुळे बंदरात आणि बंदराबाहेर शेकडो बोटी गाळात अडकून पडतात. त्यामुळे बंदरातील गाळ काढण्याची मागणी करंजा मच्छिमार संस्था व मच्छिमारांकडून केली जात होती. अखेर या पाठपुराव्याला यश आले आहे.

मच्छिमारांच्या समस्या दूर करण्यासाठी राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाने करंजा मच्छिमार बंदराच्या विविध प्रकारच्या २१ कामांसाठी खर्चाचा प्रस्तावाला मंजुरी दिली आहे, अशी माहिती मत्स्यव्यवसाय विभागाचे सहआयुक्त महेश देवरे यांनी दिली. यामध्ये प्रामुख्याने ३७० मीटर लांबीची अतिरिक्त धक्काभिंत उभारण्याच्या कामासाठी २६ कोटी ७७ लाख ८८ हजार ६३२ कोटी तर प्रवेश मार्गावरील गाळ व रुंदीकरणाच्या कामासाठी २१ कोटी २५ लाख ४७ हजार ८३ रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

बंदरातील कॉंक्रीटीकरण, लिलाव केंद्र -४, प्रशासकीय भवन, संपर्कासाठी रेडिओ भवन, उपहारगृह, सुरक्षा कक्ष, कंपाऊंड वॉल,सेव्हरेज ट्रिटमेंट प्लाण्ट, बर्फ फॅक्टरी ,१०० टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज, पाणीपुरवठा, ड्रेनेज, सेव्हरेज सिस्टीम, डिझेल पंप आदी विविध प्रकारच्या कामांसाठी ८८ कोटी ७५ लाख ४७ हजार ७३६ रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सूचना

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांच्या सुचनेवरून, मी, सॅमसन मायकेल सोगावकर हरजेल मायकेल सोगावकर, केरेन मायकेल सोगावकर, रिना डॅनियल तळेगावकर, सेरा मोलवीन तळकर, बिना मायकेल सोगावकर, मधुकर रामकृष्ण गोरेगावकर, विनय रामकृष्ण गोरेगावकर, अरूणा शरद गोरेगावकर, जितेंद्र शरद गोरेगावकर, वैशाली प्रमोद देवरूखकर, सुनिता महेश पेणकर यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीबाबत हक्क व अधिकारांची चौकशी आणि पडताळणी करीत आहे.

खालील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा अथवा कोणत्याही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, वाटप, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा, लिन, एकाधिकार, करार, हक्कसोड, वारसा, उत्तराधिकार, सुविधाधिकार, न्यास, कुळाने, भाडे व पोट-भाडेदारी, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भागीदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर आणि/किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सूचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत त्यांच्या दस्ताऐवजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा माझे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि/किंवा परित्यजन करण्यात आल्याचे आणि/किंवा सोडून आल्याचे गृहीत धरून मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(मिळकतीचे वर्णन)**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| अबीटघर ता. मुरूड जि. रायगड | २ | वरकस २.६१.०० जा.यो.क्षेत्र २.६१.०० पो.ख. ०.१३.०० एकूण क्षेत्र २.७४.०० | २.१४ | सॅमसन मायकेल सोगावकर हरजेल मायकेल सोगावकर केरेन मायकेल सोगावकर रिना डॅनियल तळेगावकर सेरा मोलवीन तळकर बिना मायकेल सोगावकर मधुकर रामकृष्ण गोरेगावकर विनय रामकृष्ण गोरेगावकर अरूणा शरद गोरेगावकर जितेंद्र शरद गोरेगावकर वैशाली प्रमोद देवरूखकर सुनिता महेश पेणकर |

ठिकाण : मुरूड
सही/-
दिनांक : २२/०९/२०२६
**ॲड. अमित विष्णू राऊळ**
ऑफिस रा. सातिर्जे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड
पि.नं.४०२२०८ मो.नं. ८४३३७९५२५५/८६९८०००२३८

## जाहीर नोटीस

**तहसीलदार रोहा, जि. रायगड यांचे न्यायालय**

हक्कनोंद केस क्र. ७२/२०२६

प्रति.
१. श्रीम. स्नेहल रोहन किल्लेकर — अर्जदार
रा.गोंधळपाडा, ता.अलिबाग

विषय : मौजे गोपाळवट, ता.रोहा येथील स. नं./ग. नं. २२ या मिळकतीस फेरफार क्र.३५४ व ३६२ अन्वये क्षेत्राची नोंद करून मिळण्याबाबत.

सदर जाहीर नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना व जनतेस कळविण्यात येते की, कर्जदार श्रीमती स्नेहल रोहन किल्लेकर, रा.गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी मौजे गोपाळवट, ता.रोहा येथील स.नं./ग.नं.२२ या मिळकतीस फेरफार क्र. ३५४ व ३६२ अन्वये क्षेत्राची नोंद करून मिळण्याबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर प्रकरणी या न्यायालयामार्फत दिनांक १७/०९/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असून, सदर सुनावणीस अर्जदार यांचे विधिज्ञ उपस्थित होते. तथापि, सदर मिळकतीचे सहहिस्सेदार गैरहजर होते.

तरी, मौजे गोपाळवट, ता. रोहा येथील स. नं./ग.नं. २२ या मिळकतीस फेरफार क्र.३५४ व ३६२ अन्वये क्षेत्राची नोंद करून मिळण्याबाबत कोणास काही हरकत असल्यास, त्यांनी आपली हरकत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत दिनांक २८/०९/२०२६ रोजी होणाऱ्या सुनावणी दरम्यान या न्यायालयात समक्ष उपस्थित राहून सादर करावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर प्रकरणी कोणाचीही हरकत नाही असे गृहीत धरून, अर्जदार यांच्या अर्जानुसार नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच, विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.
सदर जाहीर नोटीस आज दिनांक १७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

सही/-
**(डॉ. किशोर देशमुख)**
**तहसीलदार रोहा**

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी मौजे वयाळ, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड येथील खालील नमूद करण्यात आलेली मिळकत ही श्री. श्यामा लालजी बेरा राहणार: ५०३, हरी गोविंद धाम, भूखंड क्र. १७, सेक्टर १५ ग्रीन प्लाम बिल्डींग जवळ, घणसोली, नवी महाराष्ट्र यांचे कडून खरेदी करण्याचे निश्चित केलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | भूधारणा पद्धती | गटक्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे आर-चौ.मी.) |
|---|---|---|---|
| वयाळ | वर्ग १ | ६/५ | ०-१३-१० पोटखराबा ०-०१-८० एकूण ०-१४-९० |

वर नमूद करण्यात आलेली मिळकत ही श्री. श्यामा लालजी बेरा यांनी सदर मिळकतीचे पूर्वीचे भोगवटादार -सुवर्णा शाम पाटील, सुनिल बळीराम पवार, जया बळीराम पारंगे, मच्छिंद्र बळीराम पवार, यमुना नामदेव भोपी यांचेकडून दिनांक ०९/०९/२०२६ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताद्वारे खरेदी केलेली असून सदरचा खरेदीखत हा सह दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्त क्र. ७२१२ - २०२६ अन्वये रितसर नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सबब अश्याप्रकारे श्री. श्यामा लालजी बेरा हे सदर मिळकतीचे रितसर मालक झालेले आहेत.

आमचे आशिलांनी श्री. श्यामा लालजी बेरा यांच्याकडून वर नमूद मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे निश्चीत केलेले आहे. तरी सदर मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी आमचे अशिलांनी सदर मिळकतीमधील संबंधीत मुळ मालक/ भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

तरी वर नमूद मिळकत वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून तसा टायटल रिपोर्ट देण्यात येईल तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमूद मिळकती नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरीत करुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

Sd / -
SAMEER S. MHATRE
102, SHREE BALAJI CO.H.S,
PLOT NO. 98/A/2, SWAMI NITYANAND MARG,
NEAR SARSWAT BANK, PANVEL,
DIST.- RAIGAD, 410 206, 9821657456

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिलांनी यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाचे नाव | गावाचे नाव | स. न / हि.न | एकूण क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रू पै |
|---|---|---|---|---|
| नितिन किसन बडेकर | नालधे ता. कर्जत | ५/३० | ००-२४-०० | ०-१२ |
| मनोहर सदाशिव थोरवे | | ५/३४ | ००-३३-०० | ०-१९ |
| महेश गजाजन ठाकरे | | ५/३१ | ००-०३-०० | ०-०३ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २२/०९/२०२६
सही /-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत- रायगड मो. ९८८११३२२४८

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

संकिर्ण अर्ज /२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री.फजल मेहमुद अ.र.जमादार — अर्जदार
रा.शिघ्रे, ता.मुरुड जि.रायगड

विरुद्ध

१. इब्राहीम उमर भालदार
२. इसुफ उमर भालदार
३. काशीम उमर भालदार — सामनेवाले
४. खतीजा हुसेन भालदार
५. हजिरा हसन दखनी
६. हालिमा उमर मांडलेकर
७. असीम युसूफ भालदार
रा.शिघ्रे, ता.मुरुड जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मौजे सायगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथील स.नं. ३२/१ ह्या मिळकतच्या कब्जेदार सदरी खरेदीखत सन १९३८ अन्वये नावाची नोंद करुन मिळणेकामी अर्ज या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्यानुषंगाने या न्यायालयाकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १४९ व १५० कामकाज चालविण्यात येत आहे. सदर प्रकरणी सुनावणी नोटीस देऊनही सामनेवाले न्यायालयात उपस्थित राहिलेले नाहीत.

तरी मौजे सायगांव, ता.मुरुड, जि.रायगड येथील स.नं. ३२/१ ह्या मिळकतच्या कब्जेदार सदरी खरेदीखत सन-१९३८ अन्वये नावाची नोंद करणेबाबत हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे.न्यायालयांत दि.२९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन मौजे सायगाव, ता.मुरुड, जि.रायगड येथील स.नं. ३२/१ ह्या मिळकतीचे ७/१२ च्या कब्जेदार सदरी नोंद घेणेबाबत आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २१/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र. ३०१

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))
स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेणशहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १०/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०२/०१/२०२४ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. देवेन अरुण यादव कौशल्य हिल, २ मजला, प्लॉट नं. १६२, मु-वरसोळी, ता-मावळ, जि-पुणे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यतची रक्कम रूपये ६१,३७,७१७/- व दिनांक ०१/०४/२०२२ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे. न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून
श्री. देवेन अरुण यादव यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन.
गाव पोसरी ता. कर्जत सर्वे क्र. २८/८/अ क्षेत्र ०.७४.९०

येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेणच्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये ६१,३७,७१७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. देवेन अरुण यादव**

१. श्री. देवेन अरुण यादव यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
गाव पोसरी ता. कर्जत सर्वे क्र. २८/८/अ क्षेत्र ०.७४.९०

स्थळ : पेण
दिनांक : २२/०९/२०२६
**श्री. अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीशीने सर्वाना कळविणेत येते की, खालील नमुद मिळकत आमचे अशिलांनी सदर शेती स्वरूपाच्या मिळकतीचे मालक श्री. अतुल अरूण कसबेकर व सौ. वंदना अतुल कसबेकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| अ.क्र | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १. | ३२/२ | ००-६७-०० | १-६० |

येणेप्रमाणे तदंगभुत हक्क हितसंबंध सुद्धा

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबध, बोजा, वहिवाट, पोटगी, गहाण, दान, हक्कसोड पत्र, बक्षिस, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

ता.२१/०९/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. योजना अनिल शिंदे उर्फ**
ॲड.सौ.योजना मनिष सुर्वे
रा.श्रीनाथ अपार्टमेंट, फ्लॅट नं.३०२,
तिसरा मजला, भैरवनाथ मंदीरासमोर,
मुद्रे (बु.),कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.

**नॉटिलस को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड**
पत्ता- मु. तळवली, पो. खंडाळे,
ता. अलिबाग, जि. रायगड

## निविदा सूचना

नॉटिलस सोसायटी तळवली अलिबाग येथे खालील कामांसाठी व्हेंडरची आवश्यकता आहे.
१. जिन्यांचे कठडे व रेलिंग यांची दुरूस्ती व पेंटिंग
२. स्विमिंग पूल देखभाल दुरूस्ती
३. इमारत सिव्हिल लिकेज दोष दुरूस्ती
४. सोसायटी कॅम्पसमधील सौर पॅनेल
५. नवीन स्पेक्टिक टँक भांड काम
६. पाण्याचा टाकीचा क्लिनर
सोसायटी आवारात ०८ इमारती मिळून २० विंग आहेत. इच्छुक व्हेंडरनी अधिक माहितीसाठी सोसायटीच्या कार्यालयात संपर्क साधावा.
मोबाईल नं. ७५५८६६५४२२
अध्यक्ष/सचिव
नॉटिलस कॉ-ऑप हौसिंग सोसायटी लि.
अलिबाग, जि. रायगड

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याच... ने– तन्मणी, चींचपेटी, ...गड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २०.०३.२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १७.०८.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. विवेक गोविंद लाड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०७.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये ५२,३४,४८४/- व दिनांक ०१.०८.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी - १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव आत्करगाव, ग्रामपंचायत आत्करगाव हद्दीतील मिळकत नं. १४४ अ खालापुर, तालुका खालापुर येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये ५२,३४,४८४/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :-श्री.विवेक गोविंद लाड**

मौजे आत्करगाव, येथील सौ. श्री. विवेक गोविंद लाड यांचे नावे असलेले खोपोली ग्रामपंचायत आत्करगाव हद्दीतील मिळकत नं. १४४ अ कौलारू भिंती घर, क्षेत्रफळ ६९० चौ. फुट

स्थळ : खालापूर
सही/-
दिनांक : १८.०९.२०२६
**श्री.आर.जी.पालकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजेच कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २६.१२.२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १७.०८.२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ. सुविदा सचिन खैर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१.०७.२०२६ पर्यंतची रक्कम रूपये १२,०५,३३८/- व दिनांक ०१.०८.२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १०.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून गाव खोपोली, नगरपरिषद खोपोली हद्दीतील स.न.२३/१ अ सि.स.न ३०२१, ३०२२, ३०२३ खालापुर, तालुका खालापुर येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणत्याही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा खोपोली च्या दिनांक ३१.०७.२०२६ रोजी येणे रक्कम रूपये १२,०५,३३८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. सुविदा सचिन खैर**

मौजे खोपोली, येथील सौ. सुविदा सचिन खैर यांचे नावे असलेले खोपोली, नगरपरिषद खोपोली हद्दीतील स.न. २३/१ असि.स.न ३०२१, ३०२२. ३०२३, सदनिका क्रमांक ए २०२, २ रा मजला, ऐ विंग, साबळे साई सिद्धी इमारत, क्षेत्रफळ ६७७ चौ. फुट

स्थळ : खालापूर
सही/-
दिनांक : १८.०९.२०२६
**श्री.आर.जी.पालकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र. ३०० — **फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ३०/१२/२०२० रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १४/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्रीमती. झाकिया सादुल्ला सोंडे बौद्ध विहार जवळ, ९/२५६, रोहिदास नगर, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ०१/१२/२०२० पर्यंतची रक्कम रूपये २५,४७,७७८/- व दिनांक ०१/०१/२०२१ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १४ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून
श्रीमती. झाकिया सादुल्ला सोंडे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन.
पेण नगरपरिषद हद्दीतील ता. पेण मालमत्ता क्र. ९/२५६ क्षेत्रफळ ३१.०३ चौ.मी
श्री. आब्दल्ला इस्माईल सोंडे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन.
गाव माजगाव ता.मुरुड सर्वे क्र. ४२२ क्षेत्र ०.०५.२८
येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा जोहे च्या दिनांक ०१/१२/२०२० रोजी येणे रक्कम रूपये २५,४७,७७८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधीन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्रीमती. झाकिया सादुल्ला सोंडे**

१. श्रीमती. झाकिया सादुल्ला सोंडे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन, पेण नगरपरिषद हद्दीतील ता. पेण मालमत्ता क्र. ९/२५६ क्षेत्रफळ ३१.०३ चौ.मी २. श्री. आब्दल्ला इस्माईल सोंडे यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन, गाव माजगाव ता.मुरुड सर्वे क्र. ४२२ क्षेत्र ०.०५.२८

स्थळ : पेण
दिनांक : १६/०९/२०२६
**श्री. अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक-(१) हंसा शंकर म्हात्रे (२) सुनंदा रामचंद्र तुरे (३) गुरुनाथ शंकर म्हात्रे (४) स्नेहा सुनिल माळवी (५) वंदना दिवाकर म्हात्रे (६) अमोल शंकर म्हात्रे (७) संपदा संदेश मोकल यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशील सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणी जिल्हा व उप जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे चंदरवाडी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली गट क्रमांक व उपविभाग ८/१/अ, एकूण क्षेत्रफळ ०.३२.०० हे.आर.चौ.मी. ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक २२ सप्टेंबर २०२६

क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
(+९१ ९८३३६ २५१९५)

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र.२९९ — **फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २३/१२/२०२० रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १०/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ. रेखा दिलीप पाटील मु-शेणे, पो-सावरसई, ता. पेण रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ०१/१२/२०२० पर्यंतची रक्कम रूपये ४१,६६,४६९/- व दिनांक ०१/०१/२०२१ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १३ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून
सौ.रेखा दिलीप पाटील यांच्या नावाची खालील वर्णनाची जमिन
गाव सापोली ता.पेण येथील सर्वे क्र.७५ क्षेत्र ०-३०-१ व सर्वे क्र. ७७ क्षेत्र ०-१०-१

येथील वरील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा जोहे च्या दिनांक ०१/१२/२०२० रोजी येणे रक्कम रूपये ४१,६६,४६९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अीधन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. रेखा दिलीप पाटील**

सौ. रेखा दिलीप पाटील यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
गाव सापोली ता.पेण येथील सर्वे क्र.७५ क्षेत्र ०-३०-१ व सर्वे क्र.७७ क्षेत्र ०-१०-१

स्थळ : पेण
दिनांक : २१.०९.२०२६
**श्री अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवती सहकारी बँक लि अलिबाग

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● अनिल म्हात्रे, स्वप्निल म्हात्रे, थळ यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशाची सुबक मूर्ती व कृष्णा सुदामा कांदा फोडी खेळाताना सुंदर देखावा



● मुंबई प्रभादेवी येथील मंदा किशोर कर्वे आणि कर्वे परिवार गणेशाची सुबक मूर्ती व इकोफ्रेंडली पाताळ सुंदर देखावा (छायाचित्र : सुनिल ठाकूर)



● श्री. मंगेश यशवंत पाटील, मु. धेरंड, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. सुशांतभाई लक्ष्मण पोसतांडेल मु. न्हावे ता. रोहा यांच्या निवासस्थानी गणेशाची मुर्ती (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● श्री. चिंतामणी डबीर आणि परिवार यांनी गिरनार गुजरात येथील गुरुशिखर पादुका संस्थान चा देखावा साजर केला आहे. (छायाचित्र : सत्यप्रसाद आडाव)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील मोंढे कुटुंबाच्या निवासस्थानी विराजमान गणराज. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● श्री . रविंद्र पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा चे दर्शन घेताना. श्री. प्रतिक भालचंद्र खारकर ( शे.का. प. पुरोगामी युवक संघटना सदस्य बामणगांव )

# भारताच्या लेकींची सुवर्ण कामगिरी

■ सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदकावर नाव कोरलं

■ स्मृतीची दमदार अर्धशतकी खेळी





मानधनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ११ हजार धावांचा ऐतिहासिक टप्पाही गाठला. रिचा घोषने संघाला २००चा टप्पा पार करून दिला. अवघ्या २२ चेंडूत तिने ४९ धावांची आक्रमक खेळी केली होती. ६ चौकार आणि ३ षटकारांची आतषबाजी केली होती.



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एशियन गेम्स २०२६ मधील महिला भारतीय संघाने अंतिम सामन्यात श्रीलंकेचा १४७ धावांनी पराभव करत सुवर्णपदक जिंकले आहे. एशियन गेम्समधील महिला भारतीय संघाचे हे सलग दुसरे सुवर्णपदक ठरले आहे.

टॉस जिंकत भारतीय संघाने पहिल्यांदा बॅटिंग करताना २० ओव्हरमध्ये २१६-३ धावा केल्या होत्या. भारताकडून सलामावीर स्मृती मानधना हिने सर्वाधिक ७९ धावांची दमदार अर्धशतकी खेळी केली होती. त्यासोबतच शेफाली वर्मा ४८ धावा आणि रिचा घोषने नाबाद ४९ धावांची खेळी केली होती.

या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ ६९ धावांवर ऑल आऊट झाला. भारताच्या गोलंदाजांसमोर लंकेच्या फलंदाजांनी सपशेल नांगी टाकली. फायनल सामन्यात भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक ३ विकेट तर शेफाली, श्रेयांका आणि श्रीचरणी यांनी प्रत्येकी दोन विकेट नावावर केल्या होत्या.

श्रीलंका संघाच्या सात खेळाडूंना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही. तर यामधील तीन खेळाडू शून्यावर आऊट झाले. एशियन गेम २०२६ मधील भारताचे हे पहिले सुवर्णपदक मिळाले आहे.

भारताच्या डावाची सुरुवातच आक्रमक झाली होती. स्मृती मानधना आणि शेफाली वर्मा या सलामीच्या जोडीने श्रीलंकेच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासूनच दबाव निर्माण केला. दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल ९९ धावांची भागीदारी करत संघाला भक्कम पाया मिळवून दिला.

पॉवरप्लेच्या सहा ओव्हरमध्ये भारताने एकही विकेट न गमावता ६७ धावा केल्या होत्या. मानधनाने आपल्या फटकेबाजीने सुरुवातीपासूनच इरादे दाखवले होतेय. तिसऱ्या ओव्हरमध्ये तिने सलग दोन षटकार खेचत श्रीलंकेच्या गोलंदाजांना सावध केले. दुसऱ्या बाजूला शेफालीनेही वेगवान धावा करत तिची उत्तम साथ दिली. शेफाली ४८ धावांवर आऊट झाली.

कर्णधार हरमनप्रीत कौरकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, मात्र, ती १७ चेंडूमध्ये १९ धावा करून माघारी परतली. मानधनाने आपली आक्रमक फलंदाजी कायम ठेवत ४५ चेंडूंत ७९ धावांची शानदार खेळी साकारली. तिच्या या खेळीत ५ चौकार आणि ७ षटकारांचा समावेश होता.

दरम्यान, या धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या श्रीलंका संघाला सुरूवातीपासूनच धक्के बसले. कर्णधार चमारी अथापथुने सर्वाधिक २९ धांवाची खेळी केली होती. यामध्ये तिने ५ चौकार मारलेले मात्र, दीप्ती शर्मा हिने तिला आऊट केले. बाकी फक्त कौशानी नुथ्यांगनाने १४ धावा तर कविशा दिलहरीने ११ धावा केल्या होत्या. इतर कोणालाही दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही.




● मुरुड नगरपरिषदेचे नगरसेवक पांडुरंग आरेकर यांच्या कोळीवाड्यातील निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती व गोरक्षनाथ प्रकटीकरण चलचित्र गणेश भक्तांचे आकर्षण ठरले आहे. (छाया:राजीव नेवासेकर)




● श्रीश सागर म्हात्रे. थळ-पारोडा यांच्या घरातील शिवमय रुपी सुबक गणेशमूर्ती

# पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय स्पर्धेत नेत्रदीपक यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धा नुकत्याच नेहुली येथे पार पडल्या यामध्ये पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले.




■ **विजयी स्पर्धकांची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड**

१७ वर्षा खालील मुलींच्या ६२ किलो वजनी गटात नुपूर सतीश बुंदके तृतीय क्रमांक पटकावला, १९ वर्षा खालील मुली ४५ किलो वजनी गट श्रावणी मनोज मोरे द्वितीय क्रमांक, ४५ किलो वजन गट आरोही अविनाश म्हात्रे तृतीय क्रमांक, १९ वर्षा खालील मुली ४८ किलो वजनी गट श्रावणी निकेत भगत प्रथम क्रमांक मिळविला.

१९ वर्षा खालील मुली ५२ किलो वजनी गट आयेशा किस्मत खान द्वितीय क्रमांक १९ वर्षा खालील मुले ४४ किलो वजनी गट रोहांशू अजिंक्य पाटील प्रथम क्रमांक, १९ वर्षा खालील मुले ६२ किलो वजनी गट अंश ओमप्रकाश किल्लेकर प्रथम क्रमांक, १९ वर्षा खालील मुले ७० किलो वजनी गट निसर्ग पाटील द्वितीय क्रमांक, निमिष करवडे तृतीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षा खालील मुले ७५ किलो वजनी गट आदिल दापोलकर प्रथम क्रमांक, अंश साखरकर द्वितीय क्रमांक १९ वर्षा खालील मुले ९० किलो वजनी गट तन्मय लखन प्रथम क्रमांक, १९ वर्षा खालील मुले ५२ किलो वजनी गट दक्ष रणजीत घोडके द्वितीय क्रमांक, १७ वर्षा खालील मुले ५६ किलो वजनी गट हमाजा इरफान मुकादम प्रथम क्रमांक, यशराज भारत माने द्वितीय क्रमांक, १७ वर्षा खालील मुले ५२ किलो वजनी गट शौर्य देवेंद्र तांबोळी द्वितीय क्रमांक, १७ वर्षा खालील मुले ८० किलो वजनी गटात आर्यन अजय मयेकर याने द्वितीय क्रमांक पटकावला त्यांची मुंबई विभागीय वुशू क्रीडा स्पर्धेत निवड झाली.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा प्रशिक्षक अक्षय डाकी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्वराज, प्रथमेशचा महाराष्ट्र क्रिकेट असो.निवड चाचणी शिबिरात निवड

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे दोन उदयनमुख खेळाडू स्वराज गोवारी व प्रथमेश मोरे या सोळा वर्षाखालील युवा खेळाडूंचा समावेश महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या संघ निवड चाचणी शिबिरामध्ये करण्यात आला आहे.स्वराज गोवारी पनवेल हा सलामीवीर फलंदाज आहे तर प्रथमेश मोरे हा जलदगती गोलंदाज म्हणून ओळखला जातो.दोन्ही खेळाडूंनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्यासाठी खेळतांना उत्कृष्ट कामगिरी केली असून त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे त्यांची निवड पुढील होणाऱ्या संघ निवड चाचणी शिबिरामध्ये करण्यात आली आहे. स्वराज गोवारी हा पनवेल तालुक्यातील गुणवान खेळाडू असून सुनिल सरगर क्रिकेट अकॅडमी येथे प्रशिक्षण घेत आहे तर प्रथमेश मोरे हा माणगाव तालुक्यातील प्रतिभावान युवा जलदगती गोलंदाज असून नयन शिंदे यांच्या अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेत आहे.दोन्ही खेळाडूंच्या प्रशिक्षकांने खेळाडूंच्या कामगिरीवर समाधान व आनंद व्यक्त केला आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्या सह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी दोन्ही खेळाडूंच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ग. बा. वडेर कॉलेजचे घवघवीत यश

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या वतीने ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनियर कॉलेज सुधागड-पाली येथे आयोजित सेवा संकल्प अभियान २०२६ अंतर्गत सुधागड तालुका स्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या.




या स्पर्धेचे बक्षीस वितरण रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.१९ वर्ष वयोगटातील कबड्डी स्पर्धेत मुले प्रथम क्रमांक ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल ज्युनियर कॉलेज, पाली तर द्वितीय क्रमांक संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव तसेच १९ वर्ष वयोगटातील कबड्डी स्पर्धे त मुली प्रथम क्रमांक बल्लाळ विनायक विद्यालय पाली,द्वितीय क्रमांक ग. बा. वडेर व ओसवाल ज्युनियर कॉलेज, पाली

यावेळी स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंचे मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन अभिनंदन करण्यात आले. तसेच ही स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली त्याबद्दल तालुका क्रीडा प्रमुख मोहन म्हात्रे,त्याचे सहकारी,सर्व शाळांचे क्रीडा व्यवस्थापक पंच यांचे जिल्हा क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले. पालीच्या ग. बा. वडेर कॉलेजच्या संघाने मुले गटात प्रथम क्रमांक तर मुली द्वितीय क्रमांक पटकावल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, क्रीडा शिक्षक व सर्व शिक्षकवृंदाने विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)